RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३०४५१

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

दि. ०५ जुलै २०२६



१९२०- बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यास भिमराव आंबेडकर विलायतेला रवाना.
१९२३- डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई हायकोर्टात वकिली व्यवसायासाठी नोंदणी केली.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

रविवार ०५ जुलै २०२६ | वर्ष : ६ | अंक : १८५ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Sunday, 05 July 2026 | Year : 6 | Issue : 185 | Daily | Rate: Rs. 5/-

# राज्यात पावसाचा जोर वाढला

## घाट परिसराला रेड अलर्ट!



**मुंबई :** राज्यात बहुतांश भागात जून महिना कोरडा गेल्यानंतर जुलैच्या सुरुवातीलाच अनेक भागात दमदार पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे राज्यवासियांना काहीसा दिलासा मिळत असून काही जिल्ह्यांमध्ये शेतीच्या कामांना वेग प्राप्त झाला आहे . दरम्यान, उत्तर कोकणातील काही भागात शनिवारी सकाळपासून अतिवृष्टीसदृश्य पावसाची नोंद होत असून मध्य महाराष्ट्रातील घाट विभागात पावसाचा जोर अधिक आहे. राज्यातील अनेक भागात मंगळवारपर्यंत पावसाचा जोर राहण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाकडून राज्यातील काही भागांना 'रेड' तर काही भागांना 'ऑरेंज' अलर्ट देण्यात आला आहे. यंदा जूनच्या शेवटच्या आठवड्यात मान्सूनने संपूर्ण राज्य व्यापले होते. मात्र, त्यानंतरही राज्यात सर्वदूर पावसाचा अभाव होता. त्यामुळे चिंता व्यक्त केली जात होती. दरम्यान, मागील काही दिवसांपासून अनेक भागात दमदार पाऊस नोंदला जात आहे. राज्याच्या किनारपट्टीपासून ते कर्नाटक किनारपट्टीपर्यंत समुद्रसपाटीवर ऑफ-शोअर ट्रफ म्हणजेच कमी दाबाचा लांब पट्टा तयार झाला असून तो संपूर्ण आठवडाभर कायम राहण्याची शक्यता आहे. तसेच वायव्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले असून पुढील दोन दिवसांत ते आणखी तीव्र होण्याचा अंदाज आहे. दरम्यान, ४ ते ७ जुलैदरम्यान कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात अनेक ठिकाणी पावसाची तीव्रता वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

उत्तर कोकणातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज असून काही भागात अतिवृष्टी होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. तर दक्षिण कोकणातही पावसाचा जोर कायम राहणार आहे. मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात वादळी वाऱ्यांसह तसेच विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज आहे. तर विदर्भातील काही भागातही मुसळधार तर काही भागात मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

**'रेड' आणि 'ऑरेंज' अलर्ट कुठे?**

सातारा घाट विभाग, रायगड, पुणे घाट विभाग, मुंबई, ठाणे, पालघर आणि नाशिक घाट विभाग आदी भागांना 'रेड अलर्ट', तर कोल्हापूर घाट विभाग, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक, धुळे, नंदुरबार, वाशिम, यवतमाळ आणि गोंदिया आदी भागांना 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे.

**आज 'यलो अलर्ट' कुठे?**

अहिल्यानगर, बीड, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली आदी भागांत 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

## पावसाचे २४ तासात द्विशतक



**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने घाट परिसरात धुमाकूळ घातला आहे. विशेषतः ताम्हिणी येथे अतिमुसळधार सुरू असून, गेल्या २४ तासांत ताम्हिणी येथे २०० मिलिमीटर पाऊस नोंदवला गेल्याची माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिली. मोसमी वारे पुणे आणि परिसरात दाखल झाल्यानंतर पावसाने अल्पावधीतच जोर पकडला आहे. गेल्या तीन दिवसांपासून शहर परिसरात दिवसर पावसाची रिपरिप सुरू आहे. पावसाला जोर नसला, तरी दिवसभर सरींनी पाऊस पडतो आहे. तर घाट परिसरात पावसाची तीव्रता जास्त आहे. लोणावळा, ताम्हिणीसह भोर, निमगिरी अशा ठिकाणी जोरदार पाऊस होत आहे. हवामान विभागाच्या शनिवारी सकाळी साडेआठपर्यंतच्या आकडेवारीनुसार गेल्या २४ तासांत ताम्हिणी येथे २००, लोणावळा येथे १३६, भोर येथे ८५, निमगिरी येथे ५६,.५, माळीण येथे ३६ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला. तर शहर आणि परिसरातील एनडीए येथे ३३, पाषाण येथे ३१.४, शिवाजीनगर येथे ३०.५, दापोडी येथे २३.५, चिंचवड येथे १९.५, लवळे येथे १०.५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ अनुपम कश्यपी यांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबई, पालघर, ठाणे, रायगड तसेच नाशिक, पुणे आणि सातारा घाट भागांमध्ये पुढील ४८ तास अतिमुसळधार ते काही ठिकाणी अत्यंत अतिमुसळधार पावसामुळे रेड अलर्ट कायम राहण्याची शक्यता आहे. पुणे शहरातील पावसाचा जोर ५ जुलैच्या दुपारनंतर हळूहळू कमी होण्याची शक्यता आहे.

## रत्नागिरीत पावसाचा रौद्रावतार; एनडीआरएफ तैनात



**रत्नागिरी :** कोकणावर पावसाचे संकट अधिकच गडद होत असून रत्नागिरी जिल्ह्यात निसर्गाने अक्षरशः रौद्ररूप धारण केले आहे. अविरत कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे नद्या दुथडी भरून वाहू लागल्या आहेत, तर अनेक भागांमध्ये पूर, भूस्खलन आणि जलमय परिस्थिती निर्माण झाली आहे. जनजीवन विस्कळीत झाले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. हवामान विभागाने शनिवार आणि रविवारसाठी अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केल्याने जिल्हा प्रशासनाने संपूर्ण आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवली आहे.खेड तालुक्यातील जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडत धोक्याची घंटा वाजवली आहे. शहरातील मटण मार्केट परिसरात पुराचे पाणी शिरू लागल्याने व्यापारी आणि नागरिकांनी धास्ती घेतली आहे. चिपळूण, संगमेश्वर आणि राजापूरमध्येही पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता बळावली असून नदीकाठच्या गावांमध्ये सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

संभाव्य आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने बचाव पथके, बोटी आणि आवश्यक साहित्य सज्ज ठेवले आहे. एनडीआरएफचे तीन अधिकारी, २३ जवान आणि तीन चालकांचे पथक शुक्रवारी रात्री चिपळूणमध्ये दाखल झाले असून त्यांनी संभाव्य पूरग्रस्त भागांची पाहणी सुरू केली आहे.

दरम्यान, रत्नागिरी-कोल्हापूर महामार्गावरील आंबा घाटात शनिवारी मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. गणेश मंदिर परिसरात अचानक प्रचंड आकाराचा दगड रस्त्यावर कोसळला. मात्र, कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी आणि सांगलीहून आलेल्या काही युवकांनी प्रसंगावधान राखत तातडीने दगड हटवून वाहतूक सुरळीत केली. त्यांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला.

खेड-खोपी-धामणंद मार्गावरील कासई शिंदेवाडी येथे भलीमोठी दरड कोसळून रस्त्याचा काही भागच वाहून गेला. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.

# महत्वाच्या बातम्या

## 6 जुलैपासून प्रधानमंत्री मोदींचा तीन देशांचा दौरा



**नवी दिल्ली :** भारताचे आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील संबंध अधिक मजबूत करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढील आठवड्यापासून इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या तीन देशांच्या महत्त्वाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने शुक्रवारी या ६ दिवसीय दौऱ्याची अधिकृत घोषणा केली. हा दौरा ६ जुलैपासून सुरू होऊन ११ जुलै रोजी न्यूझीलंडमध्ये संपणार आहे. या दौऱ्याबाबत माहिती देताना परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव (पूर्व) रुद्रेंद्र टंडन यांनी सांगितले की, मॉरिशस, सेशेल्स आणि नुकताच जपानच्या पंतप्रधान सानाए ताकाईची यांच्या दिल्ली दौऱ्यानंतर, आता भारताचे लक्ष प्रामुख्याने हिंदी महासागराच्या पूर्व सागरी क्षेत्रावर आणि 'ॲक्ट ईस्ट' धोरणावर केंद्रित झाले आहे. 'ॲक्ट ईस्ट' हे भारत सरकारचे एक प्रमुख परराष्ट्र धोरण आहे. आशिया-पॅसिफिक आणि हिंद-प्रशांत क्षेत्रातील देशांशी भारताचे आर्थिक, धोरणात्मक आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करणे हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## SBL स्फोटप्रकरणात 15दिवसांत अहवाल देणार उच्चस्तरीय समिती



**नागपूर :** २६ निष्पाप कामगारांचा बळी घेणाऱ्या एसबीएल एनर्जी कंपनीतील विध्वंसक स्फोटाच्या चौकशीकरिता तीन सदस्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. जॉइंट चिफ कंट्रोलर ऑफ एक्सप्लोसिव्हज डॉ. संजना शर्मा समितीच्या अध्यक्ष तर, निवृत्त जॉइंट चिफ कंट्रोलर ऑफ एक्सप्लोसिव्हज व्ही. बी. बोरगावकर व जॉइंट चिफ कंट्रोलर ऑफ एक्सप्लोसिव्हज एस. के. दीक्षित हे सदस्य आहे केंद्र सरकारने कंट्रोलर ऑफ एक्सप्लोसिव्हज मनोज दुधे यांच्यामार्फत शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात प्रतिज्ञापत्र दाखल करून ही माहिती दिली. कामगार नेते जम्मू आनंद यांच्या जनहित याचिकेमुळे ही उच्चस्तरीय चौकशी होणार आहे. यासंदर्भात आनंद यांचे वकील ॲड, अरविंद वाघमारे यांनी स्फोटक पदार्थ कायद्यातील कलम ९-ए यामधील तरतुदीकडे लक्ष वेधले होते. त्यामुळे केंद्र सरकारने हा दिलासादायक निर्णय घेतला. ही समिती विस्फोटाची तात्कालिक आणि निकटची कारणे आणि त्याकडे नेणारी परिस्थिती निश्चित करणे; अपघाताकडे नेणाऱ्या घडामोडींचा क्रम निश्चित करणे; एसबीएल एनर्जी कंपनीने परवान्याच्या सर्व अटी, वैधानिक तरतुदी आणि कामकाजास लागू असलेल्या सुरक्षा नियमांचे पालन केले होते की नाही, याचे परीक्षण करणे, योग्य सुधारणा, अतिरिक्त सुरक्षा उपाय किंवा प्रक्रियात्मक सुधारणांची शिफारस करणे; भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांची सूचना करणे इत्यादीबावत आवश्यक चौकशी करणार आहे. या समितीला १५ दिवसांमध्ये केंद्र सरकारला अहवाल सादर करायचा आहे.

## राज्यात रस्ते दुतर्फा वृक्ष लागवडीसाठी सहा कोटी 26 लाखांचा निधी मंजूर

**अमरावती :** राज्यातील वन आणि वनेत्तर क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड व त्यांचे संवर्धन करण्यासाठी महसूल व वन विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता 'सामूहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रमांतर्गत' रस्ता दुतर्फा व वृक्ष लागवड कामांच्या प्रथम वर्षाच्या चालू बाबींसाठी सहा कोटी २६ लाख २५ हजार रुपयांचा निधी वितरित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

या महत्त्वाकांक्षी राज्य योजनेसाठी चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत एकूण ५०० कोटी रुपये इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून, त्यातील पहिल्या टप्प्यातील निधी आता वितरित होत आहे. याबाबतचा अधिकृत शासनादेश महसूल व वन विभागाचे कार्यसन अधिकारी प्रताप सातपुते यांनी ३ जुलै रोजी जारी केला आहे. वन क्षेत्राबाहेरील (वनेत्तर) रिकाम्या जागा, रस्त्यांच्या दोन्ही बाजू आणि शहरी भागांमध्ये झाडे लावून राज्याचे एकूण हरित क्षेत्र वाढवण्यास मदत होईल. वाढत्या शहरीकरणामुळे होणारे प्रदूषण कमी करणे आणि कार्बन शोषून घेण्याची क्षमता वाढवून हवामान बदलाला तोंड देता येणार आहे.

## थायलंडमध्ये भीषण दुर्घटना; ११ वर्षीय मुलाने यात्री भिक्षूंच्या मिरवणुकीत घुसवली पिकअप

### १० भिक्षूंचा मृत्यू



**बँकॉक (थायलंड), ४ जुलै :** थायलंडच्या ईशान्येकडील मुकदाहान (Mukdahan) प्रांतात घडलेल्या भीषण अपघातात ११ वर्षीय मुलाने चालविलेल्या पिकअप वाहनाने बौद्ध भिक्षूंच्या पदयात्रेत घुसून १० भिक्षूंचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. सुरुवातीच्या वृत्तांमध्ये मृतांचा आकडा ८ किंवा ९ सांगितला जात होता; मात्र अधिकृत अद्ययावत माहितीनुसार मृतांची संख्या १० वर पोहोचली आहे.

माहितीनुसार, मुकदाहान प्रांतातील ३५ बौद्ध भिक्षू आणि काही उपासक सुमारे २६० किलोमीटरच्या धार्मिक पदयात्रेसाठी निघाले होते. पदयात्रा सुरू झाल्यानंतर अवघ्या अर्ध्या तासात भरधाव पिकअप वाहनाने रस्त्याच्या कडेला चालणाऱ्या भिक्षूंना जोरदार धडक दिली. पाच भिक्षूंचा घटनास्थळी मृत्यू झाला, तर उर्वरित जखमींपैकी आणखी पाच जणांनी रुग्णालयात उपचारादरम्यान प्राण गमावले. दहाहून अधिक जखमींवर उपचार सुरू असून काहींची प्रकृती गंभीर आहे.

पोलिसांनी ११ वर्षीय मुलाला ताब्यात घेतले असून त्याने पालकांची पिकअप परवानगीशिवाय चालविल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मुलाच्या पालकांविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्याबाबतही चौकशी सुरू आहे. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य पुराव्यांची तपासणी केली जात आहे. या घटनेने थायलंडमध्ये बालकांकडून वाहन चालविणे, पालकांची जबाबदारी आणि रस्ते सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. संपूर्ण देशातून या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला जात असून मृत भिक्षूंना श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

## डिझेलमध्ये १५% आयसोब्युटेनॉल ब्लेंडिंगची तयारी सुरु

**नवी दिल्ली :** पेट्रोलमध्ये २०% इथेनॉल (E20) यशस्वीरित्या मिसळल्यानंतर आता केंद्र सरकारने आपला मोर्चा डिझेल गाड्यांकडे वळवला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी भारताच्या बायोफ्युअल ट्रान्झिशनच्या पुढच्या टप्प्याची अधिकृत घोषणा केली आहे. भारताचे परकीय चलन वाचवण्यासाठी आणि इंधनावरील स्वावलंबन वाढवण्यासाठी आता डिझेलमध्ये १५ टक्क्यांपर्यंत आइसोब्यूटेनॉल मिसळण्याची योजना सरकारने आखली आहे. सर्वसामान्यांच्या मनात प्रश्न पडू शकतो की पेट्रोलप्रमाणे डिझेलमध्ये थेट इथेनॉल का वापरले जात नाही? नितीन गडकरी यांनी स्वतः याचे कारण स्पष्ट केले आहे. इथेनॉल थेट डिझेलमध्ये रासायनिकदृष्ट्या मिसळता येत नाही. म्हणूनच आम्ही इथेनॉलवर प्रक्रिया करून त्यापासून 'आइसोब्यूटेनॉल' तयार करत आहोत. हे आइसोब्यूटेनॉल डिझेलसाठी एक सर्वोत्तम आणि सक्षम पर्याय ठरू शकते. इतर बायोफ्युएल्सच्या तुलनेत याची ऊर्जा निर्मिती क्षमता जास्त आहे. हे इंधनाचे इंजिनसोबतचे ट्यूनिंग उत्तम राखते, ज्यामुळे वाहनांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत नाही. पारंपरिक इंधनापेक्षा हे अत्यंत कमी कार्बन उत्सर्जन करते.

## महाराष्ट्रात स्मार्ट मीटर बसवणे अनिवार्य



**मुंबई :** राज्यातील वीज वितरण व्यवस्था अधिक आधुनिक आणि पारदर्शक करण्यासाठी राज्य सरकारने सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर बसविणे अनिवार्य केले आहे. मात्र, स्मार्ट मीटर बसविणे म्हणजे ग्राहकांना प्रीपेड मीटर घ्यावेच लागतील, असे नाही. प्रीपेड पद्धत स्वीकारायची की नाही, हा निर्णय ग्राहकांच्या इच्छेवरच अवलंबून असेल, असे ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी स्पष्ट केले आहे.

मीटरबाबत तक्रारी वाढल्या - सध्या राज्यात टप्प्याटप्प्याने स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत सुमारे 1 कोटी 23 लाख ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. त्यापैकी सुमारे 3 लाख 92 हजार ग्राहकांनी वीजबिल किंवा मीटरबाबत तक्रारी केल्या आहेत. या तक्रारींची तपासणी करून संबंधित ठिकाणी अधिकाऱ्यांची पथके पाठवून त्यांचे निराकरण केले जात असल्याचे सरकारने सांगितले आहे.

कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहावे लागणार नाही - स्मार्ट मीटरमुळे वीज वापराची नोंद आपोआप आणि अचूकपणे होते. त्यामुळे मीटर रीडिंगसाठी कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहावे लागत नाही. चुकीचे रीडिंग, अंदाजे बिल किंवा मानवी चुका कमी होण्यास मदत होते. तसेच ग्राहकांना त्यांच्या प्रत्यक्ष वीज वापरानुसार बिल मिळते. भविष्यात मोबाईल ॲप किंवा ऑनलाइन माध्यमातून वीज वापराची माहिती पाहणेही अधिक सोपे होणार आहे.

गेल्या काही महिन्यांत स्मार्ट मीटर आणि प्रीपेड बिलिंगबाबत अनेक शंका व्यक्त करण्यात आल्या होत्या. विशेषतः स्मार्ट मीटर बसवल्यानंतर सर्व ग्राहकांना प्रीपेड पद्धत बंधनकारक होईल, अशी चर्चा होती.

## केंद्राने कांदा खरेदीसाठी पाचव्यांदा वाढविले दर

**नवी दिल्ली :** एकीकडे मान्सूनच्या हुलकावणीमुळे खरीप कांद्याची लागवड रखडली आहे, तर दुसरीकडे बाजारात साठेबाजांनी मान वर काढली आहे. या दोन्ही संकटांना एकाच वेळी वेसण घालण्यासाठी केंद्र सरकारने आपला मोर्चा कांदा खरेदीकडे वळवला आहे. सरकारी बफर स्टॉकसाठी कांद्याची खरेदी वेगाने व्हावी आणि शेतकऱ्यांनाही योग्य मोबदला मिळावा, यासाठी सरकारने थेट १३ टक्क्यांची दरवाढ जाहीर केली आहे.आता सरकारी खरेदीचा नवा दर २,१२५ रुपये प्रति क्विंटल (२१.२५ रुपये प्रति किलो) असेल, जो यापूर्वी १,८७५ रुपये होता. ४ जुलै २०२६ पासून हे नवीन दर लागू झाले आहेत. हंगामाच्या सुरुवातीला सरकारने जो दर ठरवला होता, तिथे शेतकरी माल विकायला तयार नव्हते. परिणामी १ जूनपासून सुरू झालेल्या खरेदी प्रक्रियेत सरकारला अवघा २,००० टन कांदा गोळा करता आला आहे. शेतकऱ्यांनी बाजारातील तेजी पाहून सरकारी केंद्रांकडे पाठ फिरवल्यामुळे सरकारला तब्बल पाच वेळा आपले दर बदलावे लागले आहेत.

माहितीनुसार, देशातील काही भागांत पाऊस लांबल्याचा फायदा काही बड्या व्यापाऱ्यांनी उचलण्यास सुरुवात केली आहे.

## वॉर्डनने ६ किमी पाठीवरुन नेऊन वाचवला विद्यार्थिनीचा जीव



**विजयनगर :** आंध्र प्रदेशातील विजयनगर जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे, ज्याने प्रत्येकाचं मन हेलावून टाकलं आहे. एका आदिवासी आश्रमशाळेच्या महिला वॉर्डनने आजारी विद्यार्थिनीचा जीव वाचवण्यासाठी तिला तब्बल ६ किलोमीटर आपल्या पाठीवरून रुग्णालयात पोहोचवलं. या घटनेने एकीकडे वॉर्डनची संवेदनशीलता आणि कर्तव्यनिष्ठा जगासमोर आणली आहे, तर दुसरीकडे आदिवासी भागातील रस्ते आणि आरोग्य सुविधांच्या दुरवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केलं आहे.

विजयनगर जिल्ह्यातील गुम्मलक्ष्मीपुरम मंडळाच्या वडापुट्टी गावात ही घटना घडली आहे. गावात राहणारी भुवनेश्वरी ही आदिवासी कल्याण विभागाच्या भद्रागिरी कन्या आश्रमशाळेत सातवीत शिकणारी विद्यार्थिनी आहे. काही काळापूर्वी तिच्या वडिलांचं निधन झालं असून ती सध्या आपल्या काकांकडे राहून शिक्षण घेत आहे. सुट्ट्यांमध्ये घरी परतल्यानंतर तिला खूप ताप आला. आधी तिच्यावर कुरुपम येथील शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले, पण घरी परतल्यानंतर तिची प्रकृती पुन्हा बिघडली.

गावापर्यंत जाण्यासाठी रस्ताच नव्हता विद्यार्थिनीची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती नातेवाईकांनी शाळा प्रशासनाला दिली. माहिती मिळताच आदिवासी कल्याण विभागाच्या अधिकारी रजनी यांनी आश्रमशाळेच्या वॉर्डन हेमा यांना तात्काळ गावात जाऊन विद्यार्थिनीला रुग्णालयात दाखल करण्याचे निर्देश दिले. वॉर्डन हेमा यांनी वेळ न घालवता गाव गाठलं, पण तिथे पोहोचल्यावर त्यांच्यासमोर सर्वात मोठं आव्हान उभं राहिलं. गावापर्यंत जाण्यासाठी कोणताही रस्ता नव्हता. हा मार्ग इतका दुर्गम आणि खडकाळ होता की, तिथे वाहन तर दूरच, साधी सायकलही जाऊ शकत नव्हती.

अशा बिकट परिस्थितीत वॉर्डन हेमा यांनी हार मानली नाही. त्यांनी विद्यार्थिनीला साडीच्या साहाय्याने आपल्या पाठीवर घट्ट बांधलं आणि सुमारे ६ किलोमीटरचा खडकाळ रस्ता पायी पार करत तिला रुग्णालयात पोहोचवलं. योग्य वेळी उपचार मिळाल्याने आता विद्यार्थिनीच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेनंतर वॉर्डन हेमा यांच्या धाडसाचे आणि सेवेचे सर्वत्र कौतुक होत आहे. या घटनेने आदिवासी भागातील रस्ते, वाहतूक आणि आरोग्य सुविधांच्या कमतरतेची पोलखोलही केली आहे.

## वाढदिवसाच्या हार्दिक मंगलकामना !



आयु. बौद्धाचार्य देविदास राऊत.

ता. 05/07/2026

77 वर्ष पूर्ण
78व्या वर्षात प्रवेश




**शुभेच्छुक**

आयु.प्रशांत दे.राऊत, पौर्णिमा प्रशांत राऊत, आयु. दिनेश दे.राऊत, शीतल दिनेश राऊत, आयु.कोमल उर्फ दिपंकर दे. राऊत, नलिनी को.राऊत, आयु.अक्षय प्र.पाटील, शिल्पा अक्षय पाटील, कु. आयुष उत्कर्ष पाटील, कु. अल्पेश, तनिष्क, आरव, साक्षी, प्रिन्सेस राऊत, आणि समस्त मित्र मंडळी.

डॉ बाबासाहेब आंबेडकर मिशन, वंदना संघ दीक्षाभूमी, बहुजन हिताय संघ, दैनिक बहुजन सौरभ

PROPERTY FOR RENT/ LEASE
AVAILABLE ON RENT/ LEASE AT PRIME LOCATION
COMMERCIAL PROPERTY
Total Plot Area: 50,000 Sq.Ft.
Constructed Area: 30,000 Sq.Ft.
LOCATION: WELA (HARI), SHANKARPUR ROAD
IDEAL FOR
• Hostel/ Student Accommodation • New College/ Educational Institution • Residential College Campus • Car/ Motorcycle Showroom • Warehouse / Godown • Supermarket (D-Mart Type)
CONTACT
DR. KAMBLE: 9422539451

05 July 2026 page 02_Layout 1 7/4/2026 3:14 PM Page 1



भंडारा येथे आयोजित आदिवासी वेळा वारली चित्रांच्या प्रदर्शनीचे उद्घाटन करण्याची संधी मिळाली. यानिमित्ताने सृष्टी वामन शेडमाके हिच्या चित्रकृती बघितल्यावर आपसूकच आदिवासी संस्कृतीचे अभिन्न अंग असलेल्या वारली चित्र कृतींवर लिहावेसे वाटले....




# रेषांमध्ये जिवंत झालेली संस्कृती

## आदिवासी वारली चित्रकलेचा अद्भुत प्रवास

भारत हा विविध संस्कृती, परंपरा आणि लोककलांचा देश आहे. या भूमीवर जन्मलेल्या प्रत्येक लोककलेने आपल्या मातीचा सुगंध, निसर्गाची ओढ आणि माणसाच्या जीवनसंघर्षाचे दर्शन घडविले आहे. अशाच लोककलांमध्ये महाराष्ट्रातील वारली आदिवासी समाजाची वारली चित्रकला ही एक अनमोल सांस्कृतिक देणगी आहे. साध्या रेषा, भूमितीय आकृत्या आणि पांढऱ्या रंगाच्या माध्यमातून हजारो वर्षांचा इतिहास, निसर्गाशी असलेले नाते आणि सामूहिक जीवनाचे तत्त्वज्ञान व्यक्त करणारी ही कला आज संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेत आहे. वारली चित्रकलेचा जन्म राजवाड्यांत किंवा चित्रदालनांत झाला नाही. तिचा जन्म झाला तो मातीच्या भिंतींवर, जंगलाच्या कुशीत आणि श्रमाने नटलेल्या आदिवासी जीवनात. पालघर, डहाणू, जव्हार, मोखाडा, ठाणे आणि नाशिक परिसरात राहणाऱ्या वारली समाजाने शतकानुशतके ही कला जपली आहे. त्यांच्या दैनंदिन जीवनातील प्रत्येक आनंद, प्रत्येक उत्सव, प्रत्येक ऋतू आणि प्रत्येक श्रम या चित्रांमधून बोलताना दिसतो. अनेक अभ्यासकांच्या मते वारली चित्रकलेचा इतिहास दोन ते तीन हजार वर्षांपूर्वीचा आहे. तिचे साम्य प्रागैतिहासिक गुंफा-चित्रांशी आढळते. म्हणूनच ही कला केवळ चित्रकला नसून मानवाच्या आदिम अभिव्यक्तीचा एक जिवंत पुरावा मानली जाते. पूर्वी वारली समाजातील स्त्रिया घरांच्या मातीच्या भिंतींवर तांदळाच्या पिठापासून तयार केलेल्या पांढऱ्या रंगाने ही चित्रे काढत असत. त्यांच्यासाठी चित्रकला हा व्यवसाय नव्हता; ती श्रद्धा होती, संस्कार होता आणि जीवनाचा अविभाज्य भाग होता. वारली चित्रांकडे पाहताना प्रथम जाणवते ते त्यांचे साधेपण. पण हे साधेपण जितके निरागस दिसते तितकेच ते अर्थपूर्ण असते. सूर्य, चंद्र, झाडे, डोंगर, प्राणी, पक्षी, शेती, पेरणी, कापणी, नृत्य, विवाह, मातृत्व आणि सामूहिक श्रम अशा असंख्य प्रसंगांना या चित्रांत स्थान मिळते. प्रत्येक रेषा काहीतरी सांगते आणि प्रत्येक आकृती जीवनाचे एखादे तत्त्व शिकवून जाते. या चित्रकलेतील भूमितीय आकार विशेष लक्षवेधी आहेत. वर्तुळ म्हणजे सूर्य आणि चंद्राचे प्रतिक, त्रिकोण म्हणजे पर्वत, वृक्ष आणि शक्ती, तर चौकोन म्हणजे पवित्र स्थान. या तीन साध्या आकारांतून संपूर्ण जीवन उभे राहते. दोन त्रिकोणांनी तयार झालेली मानवी आकृती जणू सांगते की जीवनाचा समतोल निसर्गाशी एकरूप झाल्यावरच टिकून राहतो. वारली चित्रांमध्ये स्त्री-पुरुष समानतेचे सुंदर दर्शन घडते. शेती असो, नृत्य असो किंवा उत्सव, दोघेही समानतेने सहभागी होताना दिसतात. ही समानतेची भावना आजच्या आधुनिक समाजालाही विचार करायला भाग पाडते. सामूहिक श्रम, सहजीवन आणि परस्पर सहकार्य यांवर उभा असलेला वारली समाज या चित्रांमधून आपल्या जीवनमूल्यांची जपणूक करतो.



प्रा. संध्या राजुरकर
निवासी संपादक

आजच्या धावपळीच्या जगात माणूस निसर्गापासून दूर जात असताना वारली चित्रकला आपल्याला पुन्हा निसर्गाशी जोडते. झाडे, पक्षी, प्राणी, नद्या आणि ऋतुचक्र यांच्याशी असलेले सजीव नाते या चित्रांमध्ये स्पष्ट दिसते. पर्यावरणाचे संरक्षण हा स्वतंत्र विषय म्हणून येथे मांडलेला नसतो; तो जीवनशैलीचाच एक भाग असतो. म्हणूनच वारली कला ही पर्यावरणपूरक विचारांची सुंदर अभिव्यक्ती आहे. काळ बदलला आणि वारली चित्रकलाही घरांच्या भिंतींवरून कॅनव्हासवर आली. आज ती कपड्यांवर, गृहसजावटीच्या वस्तूंवर, भित्तिचित्रांमध्ये, कार्यालयांमध्ये, पुस्तकांच्या मुखपृष्ठांवर आणि डिजिटल माध्यमांमध्येही दिसू लागली आहे. भारतापुरती मर्यादित असलेली ही कला आज जगभरातील कलारसिकांना आकर्षित करत आहे. अनेक तरुण कलाकार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या कलेला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देत आहेत. या कलेमुळे हजारो आदिवासी कुटुंबांना रोजगार मिळत आहे. महिला बचतगट, स्वयंसेवी संस्था आणि विविध शासकीय योजनांमुळे अनेक कलाकार आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत. कला केवळ सौंदर्य निर्माण करत नाही, तर उपजीविकेचे साधनही बनू शकते, याचे वारली चित्रकला हे उत्तम उदाहरण आहे. तथापि, या यशाबरोबर काही आव्हानेही उभी आहेत. मशीनद्वारे तयार होणाऱ्या नकली चित्रांमुळे मूळ कलाकारांचे नुकसान होत आहे. व्यापारीकरणामुळे पारंपरिक शैलीत बदल होत आहेत. अनेक वेळा या कलेची खरी ओळख आणि मूळ कलाकार मागे पडतात. त्यामुळे या कलेचे जतन करताना तिच्या आत्म्याचे संरक्षण करणे तितकेच आवश्यक आहे. वारली चित्रकलेचे भविष्य मात्र आशादायी आहे. हस्तनिर्मित आणि पर्यावरणपूरक कलांना जागतिक स्तरावर वाढती मागणी आहे. शालेय शिक्षणात या कलेचा समावेश, आधुनिक प्रशिक्षण, डिजिटल विपणन, आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये सहभाग आणि मूळ कलाकारांच्या हक्कांचे संरक्षण यांमुळे ही कला अधिक समृद्ध होईल. वारली चित्रकला म्हणजे केवळ पांढऱ्या रंगाने काढलेली चित्रे नव्हेत; ती माणूस आणि निसर्ग यांच्यातील नात्याची कविता आहे. ती श्रमाचा उत्सव आहे, समानतेचा संदेश आहे आणि संस्कृतीचे जिवंत स्मारक आहे. काळ कितीही बदलला तरी मातीच्या भिंतीवर उमटलेल्या त्या साध्या रेषा आपल्याला नेहमी सांगत राहतील, ‘ज्याने आपल्या मातीशी नाते जपले, त्याची संस्कृती कधीच नष्ट होत नाही.’ म्हणूनच वारली चित्रकलेचे संवर्धन म्हणजे भारताच्या सांस्कृतिक आत्म्याचे जतन होय. आवश्यक असल्यास हा लेख दैनिकासाठी संपादकीय शैलीत किंवा दिवाळी अंकासाठी अधिक साहित्यिक आणि भावस्पर्शी शैलीतही तयार करून देऊ शकतो. ●●

# संविधानवादी समाजाच्या ऐतिहासिक लढ्याची नोंद

**एक ऑगस्ट 2024 रोजी सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरण आणि क्रिमिलियरच्या बाबत निर्णय दिला आणि तेव्हापासून संविधानवादी आंबेडकरी चळवळ त्याविरुद्ध उभी राहिली आहे. मुंबईत आंबेडकर भवन येथे पहिले चर्चासत्र सप्टेंबर 2024 रोजी बौद्ध महासभेचे नेते भीमरावजी आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. त्यात मी प्रमुख वक्ता होतो. तेव्हापासून दैनिक सम्राट मुंबई आणि बहुजन सौरभ नागपूर या दैनिकांनी, यू ट्यूब चॅनलने, लॉर्ड बुद्धा चॅनल, आवाज इंडिया चॅनल यांनी तसेच संविधांवादी नेते आणि कार्यकर्त्यांनी अनेक सभा संमेलने घेतले.**

## ३० जून २०२६




गेली सुमारे दोन वर्ष या निर्णयाच्या विरोधात संविधानवादी समूहामध्ये तीव्र संताप धुमसत आहे. महाराष्ट्रातील इतरही अनुसूचित जातीच्या 59 जातीमधील कार्यकर्तेसुद्धा उपवर्गीकरण आणि क्रिमीलेअरच्या विरुद्ध लढा आहेत. त्याची परिणती म्हणजे ३० जून २०२६ रोजी मुंबई येथे अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाच्या मार्गावर सुमारे पाच लाख नागरिक उपस्थित होते, तर सुमारे तीन लाख लोक प्रत्यक्ष मोर्चात सहभागी झाले, मुसळधार पावसामुळे अनेक आंदोलक रेल्वे स्थानकांवर अडकले, तर वाहतूक कोंडीमुळेही मोठ्या संख्येने लोकांना मोर्चास्थळी पोहोचता आले नाही. भारतीय राज्यघटनेतील आरक्षण व्यवस्था ही केवळ रोजगार किंवा शिक्षणातील सवलतींची योजना नसून, शतकानुशतके सामाजिक बहिष्कार, अस्पृश्यता आणि संरचनात्मक अन्याय सहन केलेल्या समाजघटकांना न्याय देण्याचे घटनात्मक साधन आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना दिलेले आरक्षण हे त्यांच्या आर्थिक स्थितीवर नव्हे, तर ऐतिहासिक सामाजिक वंचिततेवर आधारित आहे. म्हणूनच अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण आणि क्रिमीलेयर या विषयांनी गेल्या काही वर्षांत व्यापक घटनात्मक आणि सामाजिक चर्चा निर्माण केली आहे. या चर्चेला निर्णायक वळण मिळाले ते १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने पंजाब राज्य विरुद्ध दाविंदर सिंग या प्रकरणात दिलेल्या निर्णयामुळे. २००४ मध्ये इ. वी. चिनया विरुद्ध आंध्र प्रदेश या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने अनुसूचित जाती हा संविधानाच्या कलम ३४१ अंतर्गत एकसंध घटनात्मक वर्ग असल्याचे सांगितले होते. त्यामुळे राज्य सरकारांना अनुसूचित जातींमध्ये अंतर्गत उपवर्गीकरण करण्याचा अधिकार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले होते.

मात्र, १ ऑगस्ट २०२४ मध्ये सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने हा निर्णय रद्द केला. ६ विरुद्ध १ अशा बहुमताने असे मत व्यक्त केले की, जर एखाद्या राज्याकडे विश्वासार्ह आणि वस्तुनिष्ठ आकडेवारी असेल व आरक्षणाचे लाभ काहीच जातींपुरते मर्यादित राहत असल्याचे दिसत असेल, तर अधिक वंचित घटकांपर्यंत लाभ पोहोचविण्यासाठी उपवर्गीकरणाचा विचार करता येऊ शकतो. मात्र हा अधिकार अमर्याद नसून तो संविधानातील समता, विवेकशीलता आणि न्यायालयीन परीक्षणाच्या अधीन राहील असे म्हटले आहे. न्यायमूर्ती बी. आर. गवई यांनी बहुमताशी सहमती दर्शवित स्वतंत्र अभिप्राय नोंदविला. त्यांनी अनुसूचित जातींमध्ये आरक्षणाच्या लाभांचे असमान वितरण ही गंभीर बाब असल्याचे नमूद केले. त्यांनी भविष्यात सरकार क्रिमी लेयरसारख्या उपायांचा विचार करू शकेल, असे निरीक्षण नोंदविले. मात्र, या निरीक्षणाचा अर्थ सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींसाठी क्रिमीलेयर लागू केले असा होत नाही. हे न्यायालयाचे बंधनकारक आदेश नव्हते. न्यायमूर्ती विक्रम नाथ यांनीही बहुमताशी सहमती दर्शविली. त्यांच्या मते, उपवर्गीकरण हे राजकीय निर्णय नसून ते ठोस आकडेवारी, सामाजिक वास्तव आणि घटनात्मक निकषांवर आधारित असले पाहिजे. न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी यांची चक्क असहमती या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा घटनात्मक दृष्टिकोन न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी यांच्या असहमतीच्या मतातून समोर येतो. त्यांच्या मते, भारतीय संविधानाच्या कलम ३४१ अंतर्गत राष्ट्रपती अधिसूचनेद्वारे अनुसूचित जातींची यादी निश्चित केली जाते. ही यादी एकसंघ घटनात्मक वर्ग आहे. त्या यादीतील जातींमध्ये राज्य सरकारांनी उपवर्गीकरण करणे संविधानाच्या योजनेशी सुसंगत नाही. त्यांनी स्पष्ट केले की, अनुसूचित जातींच्या यादीत बदल करण्याचा अधिकार केवळ संसदेला आहे. राज्यांनी अंतर्गत विभागणी केल्यास संविधानकर्त्यांनी निर्माण केलेल्या घटनात्मक चौकटीवर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच त्यांनी इ. वी. चिनया हा निर्णय योग्य असल्याचे मत व्यक्त करून तो कायम ठेवला पाहिजे, असे नमूद केले. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत १७ सप्टेंबर १९४९ रोजी या विषयावर व्यक्त केलेले मत सुद्धा निर्णयात नमूद केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते अनुसूचित जाती-जमातींबाबतचे अधिकार संसदेला असावे. क्रिमी लेयरबाबत सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण दवींदर सिंग निर्णयात अनुसूचित जातींसाठी क्रिमी लेयर बाबत मत व्यक्त केले आहे. या निर्णयाचे बारकाईने वाचन केल्यास असे चित्र दिसते की, भारतीय न्यायशास्त्रात रेशो डेसिडेंडी आणि ओबिटर डिक्टा यांत मूलभूत फरक आहे. रेषो डिसीडेंडी हा निर्णयातील बंधनकारक कायदेशीर सिद्धांत असतो. ओबिटर डिक्टा ही न्यायमूर्तींनी व्यक्त केलेली निरीक्षणे असतात. ती मार्गदर्शक असू शकतात, परंतु ती स्वतःहून कायदा बनत नाहीत. बंधनकारक नसतात. दाविंदर सिंग प्रकरणात उपवर्गीकरण हा मुख्य प्रश्न होता. क्रिमी लेयर हा निर्णयाचा मुख्य मुद्दा नव्हता. त्यामुळे त्यावरील निरीक्षणांना बंधनकारक कायदेशीर दर्जा प्राप्त झालेला नाही. आजच्या घडीला अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी क्रिमी लेयर लागू करणारा कोणताही संसदीय कायदा अस्तित्वात नाही. उपवर्गीकरण करण्याचा कायदा नाही. परंतु न्यायालयाने राज्यांना अधिकार दिले. निर्णयामुळे निर्माण झालेले घटनात्मक प्रश्न, या निर्णयामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अनुसूचित जाती हा एकसंध घटनात्मक वर्ग आहे की त्यामध्ये अंतर्गत वर्गीकरण करता येईल? संविधान कलम ३४१ नुसार अनुसूचित जाती-जमातीच्या अनुसूचीचे राज्यांना अधिकार नसून केंद्रांना आहेत. न्यायालयाने सामाजिक न्यायाचा अर्थ सर्वांना समान लाभ देणे, सर्वाधिक वंचितांपर्यंत लाभ पोहोचविणे असे म्हटले आहे.हे वाक्य फार गोंडस वाटते. पण संविधानकर्त्यांचा मूळ हेतू काय होता? अनुसूचित जाती-जमाती यांना एकत्र ठेवण्याचा होता की आपसात भांडण लावण्याचा होता? याचाही विचार केला पाहिजे. एकत्र ठेवण्याचा निर्णय हा अनुसूचित जाती-जमाती यांची ताकद कमी होऊ नये हा दृष्टिकोन लक्षात घेऊन घेतला गेला. अनुसूचित जाती-जमातीमध्ये अंतर्गत भांडणे लावणे म्हणजे वंचितांना न्याय देणे नव्हे आणि समान न्याय नव्हे हे लक्षात घेतले पाहिजे. गोंडस शब्द वापरून कुणीही संविधानिक चौकट तोडमोड करू नये. महाराष्ट्रात अनुसूचित जातीची अशी परिस्थिती आहे की कोणत्याही एका जातीने लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक प्रगती केली नाही. कुणी कुणाला अडविले नाही. 59 जाती पूर्णपणे प्रगत नाही. अशा परिस्थिती उपवर्गीकरण करणे कितपित योग्य आहे. शिवाय संविधानात तरतूद नाही. म्हणून संविधानिक जबाबदारी आणि उत्तरदायित्व सरकारचे आहे. महाराष्ट्रात खरोखर उपवर्गीकरणाची गरज आहे काय? याचा आधी विचार केला पाहिजे. ३० जून २०२६ रोजी मुंबई येथे झालेल्या भव्य मोर्चाने हे स्पष्ट केले की, उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर समाजातील मोठ्या घटकात तीव्र असहमती आहे. मोर्चामध्ये सहभागी झालेल्या लाखो नागरिकांनी उपवर्गीकरणाचा निर्णय मागे घेण्याची मागणी केली. या पार्श्वभूमीवर सरकारने कोणताही निर्णय घेण्यापूर्वी संविधानाच्या मूळ भावनेचा, संविधान निर्मात्यांच्या विचारांचा आणि समाजातील विविध मतप्रवाहांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. दाविंदर सिंग निर्णय हा भारतीय आरक्षण व्यवस्थेतील एक टर्निंग पॉईंट आहे. बहुमताने राज्यांना मर्यादित परिस्थितीत उपवर्गीकरणाचा अधिकार मान्य केला असला, तरी न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी यांच्या असहमतीने कलम ३४१ आणि संविधानाच्या मूळ रचनेविषयी महत्त्वाचे घटनात्मक प्रश्न उपस्थित केले आहेत. या निर्णयातून एक गोष्ट स्पष्ट होते की, न्या. बेला त्रिवेदी यांच्या मतानुसार उपवर्गीकरणसारखे अधिकार राज्य सरकारच्या अखत्यारीत नाही. क्रिमीलेयर बाबत काही न्यायमूर्तींच्या निरीक्षणांना अंतिम बंधनकारक कायदा समजणे योग्य नाही. त्यामुळे मध्ये मध्ये क्रिमिलियर लावण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून घेऊ नये. एकदा सात न्यायमूर्तींनी मत व्यक्त केले आहे. आता सरकार ठरवेल. तसेच उपवर्गीकरणासारखी कोणतीही घटनात्मक भूमिका घेताना निर्णयाचा संपूर्ण अभ्यास, त्यातील बहुमताचा न्यायनिर्णय, असहमतीची मते आणि भारतीय राज्यघटनेची रचना यांचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. सरकारने कोणताही निर्णय घेण्यापूर्वी संविधानाच्या मूळ भावनेचा आणि संविधान निर्मात्यांच्या मतांचा आदर केला पाहिजे. उपवर्गीकरण बाबत निर्णय घेऊ नये कारण ते संविधानात नाही. हेच 30 जून 2026 च्या मोर्चातील आंदोलनकर्त्या संविधानवादी समूहाचे म्हणणे आहे. म्हणून ३० जून २०२६ रोजी मुंबई मधील भव्य मोर्चाची अर्थात संविधानवादी समाजाच्या लढ्याची नोंद ऐतिहासिक आहे. या मोर्चात प्रत्यक्ष सहभागी सुमारे 5 लाख संविधानवादी लोक होते. पण मनाने अप्रत्यक्ष सहभागी 1 कोटी पेक्षा अधिक लोक होते हे लक्षात घ्यावे.●●



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
मो. 9657758555

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हाच खरा आतंकवादी!

**अलीकडे भाजप संघवाले काय बरळतील याचा नेम नाही. केंद्रीय शिक्षणमंत्री ना. धर्मेंद्र प्रधान यांनी आंदोलक कॉक्रोच जनता पार्टीच्या विद्यार्थी आणि युवकांना आतंकवादी म्हटले. त्यापूर्वी नक्षलवादी, खलिस्तानवादी, काश्मीरचे मुसलमान यांना आतंकवादी म्हटले जात होते. आता आतंकवादाची व्याख्या संघ भाजपने आपल्या पद्धतीने केली.**




शिक्षणमंत्री म्हणजे ज्ञानी असतो असे आपण समजतो. पण ज्ञानाची देखील व्याख्या संघ भाजपने बदलली. ‘मोदी है तो सब मुमकिन है’ असा आजचा निर्बुद्ध काळ आला आहे. आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषदेत भाषण करताना मोदी म्हणाले होते की, ‘आमचे देशात प्लास्टिक सर्जरी पुरातन काळापासून होत आहे. शंकरजीने गणपतीला हत्याचे मुंडके बसवले होते हे सर्व जगाला माहिती आहे. पुष्पक विमान आमच्या देशाने केव्हाच शोधून काढले.’ ही भाजप संघाच्या ज्ञानाची नवी व्याख्या आहे. जगातील शास्त्रज्ञ जरी आपल्या या ज्ञानावर हसले असतील तरी आपण २०१४ सालापासून लाज सोडून दिली आहे. त्यामुळे निर्बुद्ध शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि मोदी सरकार नीती विरुद्ध, भ्रष्टाचारा विरुद्ध, पेपर फुटतात त्या विरुद्ध आंदोलन करणाऱ्यांना हे आतंकवादी म्हणत आहेत. ही देशासाठी मोठी चिंतेची बाब ठरली आहे. ‘मोदी म्हणजे राजा आणि भारतीय म्हणजे प्रजा’ असे यांना म्हणायचे आहे. यांनी लोकशाही आणि संविधान हे गुंडाळून ठेवले आहे हे आता नव्याने सांगण्याची गरज नाही. खरे पाहिले तर मुळात आतंकवादी हे संघ आणि भाजप वाले आहेत. ते लपून वार करतात. ते खुलेआम शस्त्र पूजन करतात. शस्त्र आणि शास्त्र याचा एकत्र वापर करून लोक घायाळ करणे ही यांची पद्धती. मनुस्मृती हे यांचे आतंकवादी शास्त्र आहे. गांधीजींची हत्या मनुवादी नथुराम गोडसे यानी केली. तो यांचा गोडसे आतंकवादी होता. त्याच्या सोबतीला असणारे विनायक सावरकर आणि इतर हे सर्वच आतंकवादी. यांचा संघ भाजप पुरस्कार करतो. गोविंद पानसरे, डॉ. नरेंद्र दाभोलकर, गौरी लंकेश यांची हत्या करणारे हे सर्व संघी आतंकवादी. पश्चिम बंगालमध्ये निवडणुकी नंतर आतंक माजवणारे संघ आणि भाजपवाले आतंकवादीच आहेत. मुस्लिम, ख्रिश्चन, दलीत बौद्ध धर्माच्या आणि आदिवासी लोकांना दंगल घडवून मारणारे देखील आतंकवादीच आहेत. गुजरात मध्ये मोदी सरकारने दंगल घडवून जी मुसलमान मारलीत त्या दंगलखोरांना आतंकवादीच म्हणावे लागेल. परंतु सत्ता असल्यामुळे संघ भाजप करेल ती देशभक्ती आणि त्यांच्या देशद्रोहाबद्दल बोलणारे हे आतंकवादी ठरवण्याची सुरुवात त्यांनी केली आहे. लोकांना नेहमी संभ्रमात ठेवणे ही त्यांची रणनीती आहे. त्यासाठीच ते लोकांनी अडाणी राहावे, बेरोजगार राहावे, सतत तणावात राहावे, गरीब राहावे आणि भीत भीत जगावे ही यांची आतंकवादी पद्धती आहे. मनुस्मृती हे सामाजिक आणि धार्मिक आतंकवादाचे दस्ताऐवज आहे. एकंदरीत आज देशात अराजक निर्माण झालेले आहे. गृहयुद्ध सुरू होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. हे जाणीवपूर्वक या आतंकवादी संघ भाजप सरकारने निर्माण केलेले कुकृत्य आहे.

आपल्या मागण्या घेऊन शेतकरी वर्षभर आंदोलन करतात आणि हे सरकार त्यांची ७५० माणसे मारतात हे आतंकवादी कृत्य नाही काय? लोकशाहीत आपल्या मागण्या सरकारकडे मागण्याचा अधिकार आहे. त्यामुळे त्यांनी आंदोलन केले तेव्हाही हे आतंकवादी सरकार त्यांना खलिस्तानी आतंकवादी या आंदोलनात सहभागी आहेत असे म्हणत होते. नीट आणि अशा ९० परीक्षेचे पेपर फुटतात आणि त्याविरुद्ध कॉक्रोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजित दीपके यांनी विद्यार्थी संघटित करून आंदोलन सुरू केले. हे आंदोलन रास्त आहे. सरकार पेपर फूटीची जबाबदारी का घेत नाही? केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामा आंदोलक विद्यार्थी आणि त्यांचे समर्थक का मागत आहेत? २७ लाख मुलांचे नुकसान झाले. २० मुलांनी आत्महत्या केली. याची जबाबदारी धर्मेंद्र प्रधान यांनी घेऊन राजीनामा का देऊ नये? उलट हा लायक नसलेला मंत्री जर आंदोलकांनाच आतंकवादी म्हणत असेल तर ‘चोराचे मनात चांदणे’ या म्हणीप्रमाणे आहे. हे सरकार मुलांनाच आतंकवादी म्हणत असेल तर या देशाकरीता अत्यंत दुःखद आहे. हे संघ भाजपचे लोक आतंकवादी असल्याचा पुरावा जर कोणता असेल तर राम मंदिरमध्ये झालेल्या चंदा चोरीचा.

चंपत राय आणि गिरोह या हजारो कोटी रुपयांच्या डाक्यात सामील आहे. त्यांनी स्वतःची ४०० सैनिक असलेली खासगी सिक्युरिटी लावली आहे. त्यावर १२ कोटी रुपये वर्षाला खर्च होतो. त्या सुरक्षेतच त्यांनी चोरीची रक्कम रफातफा केली. याच्याच साठी ही ४०० लोकांची फौज होती का? चोरी होत आहे हे ज्यांनी सांगितले त्यालाच चंपत राय यांनी नोकरीतून हाकलले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भारतीय कोणताच कायदा मानत नाही. टॅक्स हे लोक भरत नाहीत. त्यांच्या जवळ आलेला पैसा कोठून आला आणि कोठे खर्च केला हे सांगत नाहीत. हाच मोठा पुरावा आहे की हे चंदा चोर संघी भाजपाई आतंकवादी असल्याचा आहेत. खरे चोर सोडून त्यांचे हाताखालील चिल्लर लोक जेल मध्ये टाकलेत. चंपत राय, डॉ. अनिल शर्मा, गोपाल दास या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नेत्यांना मात्र अजूनही अटक केली नाही. तेच खरे गुन्हेगार आहेत. आता पायली भरली आहे. साधू, संत आणि शंकराचार्य देखील या चोरांना सरकारद्वारे वाचवल्या जात असल्याचा आरोप करीत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप हेच खरे आतंकवादी आहेत हे लोकांनी विश्वासाने सांगितले पाहिजे. आता यांचे कपडे उतरले आहेत आणि ते पूर्णपणे लोकांसमोर नग्न झाले आहेत. अशा नग्न झालेल्या देशद्रोही लोकांनी कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलकांना आणि नीट समस्याग्रस्त मुलांना आतंकवादी म्हणण्याची हिंमत करू नये. अन्यथा संघ आणि भाजपची जी आज नालस्ती होते आहे त्यात आणखी भर पडेल.●●

लेखांक162



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

## लोकराजा

तू रयतेचा लोकराजा, प्रजेचा मार्ग दाता,
शोषित वंचितांचा तू होता.न्यायदाता.
आरक्षणाचा प्रणेता तू बहुजनांचा त्राता,
शोषित वंचितांचा तू होता न्यायदाता.

सक्तीचे केले शिक्षण पन्नास टक्के आरक्षण,
वसतिगृहाची सवलत, शिकण्या सारे बहुजन,
रंजल्या गांजल्याचा तू होता प्राण दाता,
शोषित वंचितांचा तू होता न्याय दाता,

विधवा पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह,
कायदे करून केले मानवतेचे निर्वाह,
महात्मा फुलेंची क्रांती हा वारसा प्रदत्त होता,
शोषित वंचितांच्या तू न्यायदाता होता,

मानगांव परिषदेत नवा पान इतिहासाचा,
डॉ. बाबासाहेबांना घोषित केला नेता दलितांचा
अफाट दूरदृष्टि जणू भविष्यवेत्ता होता,
शोषित वंचितांच्या तू न्यायदाता होता.

जन्मदिन राजर्षीचा समाजिक न्यायाचा ,
डॉ. बाबासाहेब सांगून गेले हा सण वंचितांचा,
नव क्रांतिच्या युगाचा तूच निर्माता होता,
शोषित वंचितांचा तू होता न्यायदाता.

– चित्तरंजन चौरे

## पहिला पाऊस



भरल्या आभाळी काजळ छाया
दाटली हृदयी धरणीची माया
चौघडे घेऊन उभा हा वारा
सरसर आल्या मृगाच्या धारा
हास्य फुलले वैशाखाच्या ओठी
थेंबाच्या स्पर्शाने हर्षली माती
जीवाची लाही मिटली क्षणात
सुखाचा कोंब रुजते मनात
सृष्टीच्या अंगी हिरवं सोवळं
इवल्या कोंबच रूप कोवळं
अनुपम्य भासते सृष्टीचे रूप
तिला पाहून वाटतो हुरूप
बळीच्या डोळ्यात हिरवं स्वप्न
शेत शिवारी चालते तिफण
रुजल्या 'बी'ला सुखाचे भरते
इवली पाती हसते डोलते
मनात झुलते स्वप्नांचा झुला
तरुण होते वसंत तान्हुला
सजीव सृष्टीला अमृत स्पर्श
पहिला पाऊस पेरतो हर्ष...

– निशा खापरे



## काव्यफुले

संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225
बहुजन सौरभ

## पेपरफुटीच्या सरी

वारे सुटले वादळ उठले
पाऊस नसला जरी।
पैसा रूजाया इथे कोसळती
पेपर फुटीच्या सरी।।

पै पैसा बांधुन गाठीला
म्हणे शिकवावी पोरं।
त्यांच्या कष्टावर डल्ला मारती
लुटारु भामटे चोरं।।
नशीब सुद्धा त्यांची परिक्षा
घेतया कुठवरी।।...

नोकऱ्यांचा दुष्काळ सारा
प्रगती होईल कधी।
इकडे आड तिकडे विहिर
गटांगळ्या मधल्या मधी।।
आभाळाकडे डोळे लावूनी
बसलाय शेतकरी।।...

फुटाफुटीला ऊधाण आलय
गरीब बसलाय शांत।
अर्धी भाकर आज मिळाली
उद्याची त्याला भ्रांत।।
रोजंदारी करुन शेतात
माती फासतो उरी।।...

बीजे पेरली तरी अजुनी
अंकुर फुटले नाही।
या ही वर्षी म्हणावा तसा
पाऊस उठला नाही।।
कशापाई निर्माण करतोय
गरीब श्रिमंतीची दरी।।...

– मारूती सकपाळ

## जुनी डायरी

कपाटात ठेवली माझी दरवर्षीची डायरी
सगळ्यात जुनी डायरी ज्यात होती शायरी

एकेक डायरी चाळता चाळता गेले गतकाळात
मुले बघा कशी झाली लहानाची मोठी लाडात

आई-बाबा जिवंत असल्याचे दिसले त्या डायरीत
आठवले ते दिवसं कौतुक होत होते पारीत

सुखदु:खाचे क्षण सारे नजरेसमोर आले एकावेळी
तेवढ्यात मुलीने हसत दिल्या खायला दोन केळी

आठवणींनी घेतली भरारी डोळ्यात दाटले पाणी
डायरी म्हणजे असते आपल्या जीवनाची करुण कहाणी

– मीनाक्षी दमयंती

## सिया- केतन आणि जनरेशन झेड

परंपरेनुसार पालक लग्न मुलीचे ठरवितात
मुलीचा संमती त्यात सहज गृहीत धरतात

उघड केल्यास दुसऱ्या मुलावरील प्रेम तिने
चुप करतात घराण्याचे इज्जतीच्या शपथीने

नको असलेल्या मुलाशी आयुष्य घालवने
मान्य नाही जनरेशन झेड ला असे जगणे

मनातील आक्रोष बंडाचे रुप घेतो भडकुन
नकळत घडवितो जघन्य गुन्हा तिचे हातुन

अश्या गुन्ह्यामुळे स्वत:च ती उध्वस्त होते
सोबत पालकांची इज्जतही धुळीस मिळते

गुन्ह्याचे मुळ आहे पालकांचे जुनाट विचारात
मुलीपेक्षा मोठे गुन्हेगार तर पालकच आहेत

पालकांनो वेळीच साद द्या जनरेशन झेडला
अन्यथा मुकाल तुम्ही कायम आपल्या सियाला

– इंजि .नरेंद्र ताकसांडे

## जागर मानवतेचा

जळू दे दीप प्रत्येक, जागर मानवतेचा
उजळू दे जीव सारा, सागर मानवतेचा...

भिंती नकोत मनात, जोडू नवीच नाती
फुलू दे प्रेमगंधी, आगर मानवतेचा...

धर्मात, जातपातीत, अडकून का जगावे?
उभारू एक सुंदर, नागर मानवतेचा...

दुर्बळास देऊ आधार, अश्रू पुसू हसतच
असाच राहो अविरत, झंकार मानवतेचा...

द्वेषाच्या या वणव्यात, प्रेमाचाच वर्षाव
घडवू नवा उद्याचा, आधार मानवतेचा...

'रंगराज' शब्द तुझे, माणूसपण जपावे
घुमत राहो जगामध्ये, जागर मानवतेचा...

– रंगराज गोस्वामी

## मन शुद्ध करण्यास

मन शुद्ध करण्यास
आषाढ मासी सुरू होई वर्षावास
घ्यावया अनुभूती धम्माची हमखास
जाऊनी बुद्ध विहारी वंदांवे ₹तथागतास ₹
₹मन ₹शुद्ध करण्या बुद्धाचा मार्ग हमखास...१...
गावकरी उपासक एकत्र यावे
श्रामनेर भिक्खू संघास आमंत्रित करावे
ठेवुनी उपोसत *धम्म *श्रवण करावे
माणसा तू ₹नीतिमान₹ व्हावे..२...
दान करावे धम्म मार्ग क्रमनास
विहारी असू द्यावे' चैतन्याचा ' वास
उपासकांना भिक्खू- श्रमनाचा सहवास
तथागताची होईल ₹करुणा ₹हमखास...३..
'पुन्हा जन्म नाही' जे मिळेल ते याच जन्मात
कशाला* असूचितेचाख्वा धनाचा साठा करता
₹ जगर ₹ सोडताना जावे लागणार खाली हात
₹शील₹ मार्गाने होई कल्याण याच जन्मात....४...

– इंजि . शुद्धोधन बडवणे

## अंदाज पावसाचा

अंदाज पावसाचा, आला अजून नाही
आरंभ पेरणीला , झाला अजून नाही

गोठ्यात बैल माझा ,बांधून वाट बघतो
झडपास कोवळा का,पाला अजून नाही

आले फिरून वारे, देशात मोसमी जर
शमल्यात का उरीच्या,ज्वाला अजून नाही

आभाळ दाटले हे , त्या नाचती विजाही
रानात वाहला का , नाला अजून नाही

ती माणसे घरी का ,जर थांबला करोना
अद्याप खोलला का ,ताला अजून नाही

झाली तयार शेती, त्याचीच वाट बघतो
मातीस ओलवाया, आला अजून नाही

चिंता नको करू तू , येईल पावसाळा
हंगाम पेरणीचा , झाला अजून नाही

– अरुण विघ्ने

## घटनेच्या शपथी चाले..?

घोट घेतो विषाचा,दाना पाणी झालं विषारी..
गाथा वाचे तुकाराम,लागे कडवट भारी..

राही ना दवा ना हवा,इथे ना शुध्द कांहीच.?
हजम ना हाव झाली,ती भेसळ युध्द जीवाचं.!
दावे देखावा कैवारी,तो मानवतेचा वैरी..

कष्टाने विसावला तो,देऊळी अयोध्या राम..
दानशूर देई दान,कष्टाचा गाळूनी घाम..

दान पेटीचा रखवाली,तो करे चंदा चोरी..
गाव गाडा ते नातं गोतं,नांदे बंधुभावात..
फैलावे हिंदू मुस्लिम,नफरती वैर गावात..
घटनेच्या शपथी चाले,यांची छिनाल जोरी..

घोट घेतो विषाचा,दाना पाणी झालं विषारी..
गाथा वाचे तुकाराम,लागे कडवट भारी..

– दिनकर रा मडकवाडे

“ तुम्ही किती जगता यापेक्षा कसे जगता याला जास्त महत्त्व आहे... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# समर्पित रिपब्लिकन नेते अॅड. बिहारी रामजी कांबळे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजाला समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचा मार्ग दाखविताना केवळ विचार मांडले नाहीत, तर त्या विचारांना कृतीत उतरविणारे कार्यकर्तेही घडविले. डॉ. बाबासाहेबांना असे कार्यकर्ते अपेक्षित होते, जे पद, पैसा किंवा प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता समाजहिताला सर्वोच्च मानतील, शिक्षणाचा प्रसार करतील, अन्यायाविरुद्ध संघर्ष करतील आणि शेवटच्या घटकापर्यंत सामाजिक परिवर्तनाची ज्योत पोहोचवतील. महाराष्ट्राच्या भूमीत असे अनेक समर्पित कार्यकर्ते निर्माण झाले. त्यापैकी ॲड. बिहारी रामजी कांबळे हे एक अत्यंत निष्ठावान, अभ्यासू, संघर्षशील आणि लोकाभिमुख कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. दि. २ जुलै २०२६ रोजी त्यांच्या जन्माला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. ही जन्मशताब्दी केवळ एका व्यक्तीच्या जन्माची आठवण नाही, तर आंबेडकरी चळवळीतील एका समर्पित कार्यकर्त्याच्या कार्याचा पुनर्विचार करण्याची संधी आहे. ब्रम्हपुरी तालुक्यातील नान्होरी हे त्यांचे जन्मगाव. त्यांचा जन्म २ जुलै १९२६ रोजी रामजी कांबळे आणि मैनाबाई यांच्या पोटी झाला. कांबळे कुटुंब आर्थिकदृष्ट्या सधन होते. मात्र त्या काळातील जातिव्यवस्थेच्या अमानुष वास्तवामुळे संपत्ती असूनही अस्पृश्यतेचे चटके त्यांनाही सहन करावे लागत होते. हीच वेदना रामजी कांबळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीकडे घेऊन गेली. डॉ. बाबासाहेबांनी दिलेला संदेश ‘मेलेली जनावरे ओढू नका, त्यांचे मांस खाऊ नका, मुलांना शिक्षण द्या आणि स्वाभिमानाने जगा’ रामजी कांबळे यांनी आपल्या जीवनाचा ध्यास बनविला. त्यांनी खेडोपाडी जाऊन जनजागृती केली. समाजातील हीन समजल्या जाणाऱ्या प्रथा सोडण्याचे आवाहन केले. शिक्षणाशिवाय मुक्ती नाही, हा डॉ. बाबासाहेबांचा विचार त्यांनी लोकांपर्यंत पोहोचविला. याच वातावरणात बिहारी कांबळे घडले. प्राथमिक शिक्षण नान्होरी येथे तर माध्यमिक शिक्षण ब्रम्हपुरी येथे पूर्ण झाल्यानंतर ते नागपूरला उच्च शिक्षणासाठी आले. मॉरिस कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना नागपूर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचे प्रमुख केंद्र होते. तेथे विचारांचे वातावरण, सभा, आंदोलन आणि सामाजिक चर्चांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल परिणाम झाला. विद्यार्थीदशेतच त्यांचा परिचय बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्याशी झाला. पुढे हा परिचय दृढ मैत्रीत आणि सामाजिक सहकार्यामध्ये बदलला. शिक्षण पूर्ण करून त्यांनी नागपुरातून एलएलबीची पदवी घेतली आणि चंद्रपूर येथे वकिली सुरू केली. परंतु त्यांच्यासाठी वकिली हा केवळ व्यवसाय नव्हता; ती समाजसेवेचे माध्यम होती.

१९५४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर भंडारा लोकसभा मतदारसंघातून शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवत होते. त्या निवडणुकीत विदर्भातील प्रचाराची मोठी जबाबदारी बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे आणि ॲड. बिहारी कांबळे यांनी सांभाळली. डॉ. बाबासाहेबांच्या प्रचारासाठी येणाऱ्या नेते आणि कार्यकर्त्यांच्या निवास-भोजनाची व्यवस्था त्यांनी नान्होरी येथे केली. वडसा (देसाईगंज) येथील प्रचारसभेचे आयोजनही त्यांनी पुढाकार घेऊन केले. त्या काळात काँग्रेसने सरकारी विश्रामगृह



उपलब्ध होऊ नये म्हणून प्रयत्न केल्याची नोंद अनेक कार्यकर्त्यांच्या आठवणींमध्ये आढळते. अशा परिस्थितीत ॲड. बिहारी कांबळे यांनी स्थानिक प्रतिष्ठित श्रीराम जाणी यांच्या सहकार्याने डॉ. बाबासाहेबांच्या मुक्कामाची व्यवस्था केली. हे त्यांच्या संघटनकौशल्याचे आणि निष्ठेचे उदाहरण होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १९५४ च्या भंडारा लोकसभा निवडणुकीतील पराभवाने ॲड. बिहारी कांबळे यांना मोठी वेदना झाली. डॉ. बाबासाहेबांच्या पराभवामागे तत्कालीन सामाजिक व राजकीय समीकरणे कारणीभूत ठरली असली, तरी त्या निकालाने त्यांच्या मनावर खोल ठसा उमटला. डॉ. बाबासाहेबांचा विचार लोकप्रतिनिधित्वातून अधिक बळकट व्हावा, ही त्यांची प्रामाणिक इच्छा होती. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतरही त्यांनी चळवळीची धुरा खांद्यावर घेतली. १९६२ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत त्यांनी तत्कालीन भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातून रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवार म्हणून काँग्रेसचे बाळकृष्ण रामचंद्र वासनिक यांच्या विरोधात निवडणूक लढविली. त्यांना ९६,५९९ मते मिळाली, तर वासनिक यांना १,०७,५२४ मते मिळाली. अवघ्या १०,९२५ मतांनी त्यांचा पराभव झाला. पराभव झाला, पण समाजाच्या मनात त्यांनी मिळविलेला विश्वास आणि सन्मान अबाधित राहिला. ॲड. बिहारी कांबळे यांच्यासाठी निवडणूक हे सत्तेचे साधन नव्हते; ती सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया होती. त्यांनी राजकारणाला समाजकारणाची जोड दिली. म्हणूनच निवडणुकीनंतरही त्यांनी चळवळ सोडली नाही. उलट अधिक जोमाने शिक्षण, संघटन आणि जनजागृतीचे कार्य सुरू ठेवले. त्यांनी चंद्रपूर येथून बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी ‘प्रजासत्ताक’ हे रिपब्लिकन पक्षाचे मुखपत्र सुरू केले. या साप्ताहिकातून त्यांनी सामाजिक विषमता, जातीय अन्याय, अंधश्रद्धा आणि धार्मिक वर्चस्ववादावर कठोर प्रहार केले. निर्भीड पत्रकारिता ही त्यांची ओळख बनली. शंकराचार्यांविषयी प्रसिद्ध झालेल्या लेखामुळे त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. मात्र विचारांशी तडजोड करण्याऐवजी त्यांनी संघर्षाचा मार्ग स्वीकारला. भूमिहीनांचा सत्याग्रह, मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन, नान्होरी येथील रामदहन कार्यक्रम आणि सामाजिक न्यायासाठीच्या विविध संघर्षांत त्यांचा सक्रिय सहभाग होता. अनेक वेळा त्यांना अटक झाली, तुरुंगवासही भोगावा लागला; पण डॉ. बाबासाहेबांनी दिलेला ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष’ हा संदेश त्यांनी आयुष्यभर कृतीत उतरविला. या पार्श्वभूमीवर त्यांच्या सहचारिणी समरताबाई यांचे ही मोठे योगदान राहिले आहे. बिहारी बाबू यांनी शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, या विश्वासातून त्यांनी अनेक शैक्षणिक संस्थांच्या उभारणीत पुढाकार घेतला. रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी स्थापन केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल संस्थेचे ते संस्थापक सदस्य होते. ब्रम्हपुरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्थेच्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान होते. नान्होरी येथील सिद्धार्थ शिक्षण संस्थेचे ते संस्थापक अध्यक्ष होते. त्यांनी सुरू केलेल्या सिद्धार्थ हायस्कूलमधून हजारो विद्यार्थी घडले. आज त्या विद्यार्थ्यांपैकी अनेक जण डॉक्टर, वकील, प्राध्यापक, अभियंते, प्रशासकीय अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर म्हणून कार्यरत आहेत. हीच त्यांच्या कार्याची खरी स्मारके आहेत.

ॲड. बिहारी कांबळे हे केवळ वकील किंवा राजकारणी नव्हते. ते समाजशिक्षक, संघटक, पत्रकार, शिक्षणप्रेमी आणि धम्मविचारांचे प्रसारक होते. १९५६ मध्ये चंद्रपूर येथे झालेल्या धम्मदीक्षा कार्यक्रमातही त्यांनी सक्रिय भूमिका बजावली. बुद्धांच्या करुणा, समता आणि प्रज्ञेच्या विचारांचा प्रचार त्यांनी सातत्याने केला. 3 ऑक्टोबर 1957 ला रिपब्लिकन पक्षाची स्थापना नागपुरात लाखो लोकांच्या उपस्थितीत झाली. रिपब्लिकन पक्षाची घटना पुस्तक प्रकाशित करण्याचे ठरविण्यात आले. प्रिंट पुस्तकाला पाच हजार रुपये खर्च आला. त्या खर्चाची रक्कम ॲड. बिहारी कांबळे यांनी दिली होती. आजच्या काळात राजकारणात पद आणि सत्तेसाठी धावपळ दिसते; परंतु बिहारी कांबळे यांचे संपूर्ण आयुष्य मूल्याधिष्ठित राजकारणाचे उदाहरण आहे. त्यांनी कधीही वैयक्तिक लाभाचा विचार केला नाही. त्यांनी स्वतःपेक्षा समाजाला मोठे मानले. म्हणूनच त्यांचे नाव आजही मोठ्या आदराने घेतले जाते. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका व्यक्तीला अभिवादन करणे नव्हे; तर आंबेडकरी चळवळीच्या त्याग, निष्ठा, शिक्षण आणि संघर्षाच्या परंपरेला वंदन करणे होय. समाजाने त्यांच्या कार्याचा अभ्यास करणे, त्यांच्या स्मृती जतन करणे आणि नव्या पिढीपर्यंत त्यांचे योगदान पोहोचविणे ही काळाची गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, ‘महान माणसांचा गौरव त्यांच्या विचारांनी आणि कार्याने जिवंत ठेवला पाहिजे.’ ॲड. बिहारी रामजी कांबळे यांचे जीवन हे या विचारांचे मूर्त रूप आहे. त्यांनी संघर्षातून समाजाला स्वाभिमान दिला, शिक्षणाची ज्योत पेटवली आणि समतेच्या चळवळीला आयुष्यभर वाहून घेतले. त्यांचे निधन 28 जानेवारी 2008 झाले. हे वर्ष ॲड. बिहारी कांबळे जन्मशताब्दी वर्ष आहे. जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!●●



विलास गजभिये
मो. 9421588901

# संघर्षाशिवाय यश नाही आणि संयमाशिवाय आनंद नाही...

**बौद्धाचार्य देविदास अंतुजी राऊत देविदास राऊत उद्योग जगतातील नागपूर शहरातील महत्त्वपूर्ण नाव. अमरावती मधील मोर्शी तालुक्यातील ठाणाठुनी या सव्वाशे वस्तीच्या बहुसंख्येने बौद्ध असलेल्या गावातले. अत्यंत बिकट हलाखीच्या परिस्थितीतून मार्ग काढून उराशी मोठी स्वप्न बाळगून या व्यक्तिमत्त्वाने स्वप्न कशी पूर्ण होतात याचे उत्तम उदाहरण तयार केले.**

गावात वर्ग चारपर्यंत असलेली शाळा, पुढील शिक्षणासाठी अमरावतीतील करचगाव या गावात सातवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले . पण घरच्या परिस्थितीमुळे पुढील शिक्षण थांबवावे लागले. पण शहरात राहायची ओढ, मोठी स्वप्न, मोठमोठ्या इमारतीत राहावे हा मनी ध्यास. पण ध्यास पूर्ण करायला परिश्रम त्याहून दुप्पट करावे लागतात व सोबतीला प्रामाणिकपणा असावा लागतो हे त्यांना ठाऊक होते. बहिणीचे मोठे नंदई उमाकांत पाटील यांच्याकडे नागपूरला आले असता. इतवारातील पाटील यांचे दुकान पाहून मला हे काम जमू शकते व हे मी करू शकतो असा आत्मविश्वास त्यांच्यात होता. 16 जुलै 1969 ला वीस वर्षाचे देविदास राऊत खिशात 7 रुपये व अंगावरच्या कपड्याने उमाकांत पाटील यांच्या बोलवण्यावरून नागपुरात दाखल झाले. 40 रुपये महिन्याच्या पगारावर ते त्यांच्याकडे काम करून पण प्रामाणिकपणे. कधी हैदराबाद, कधी गोंदिया या ठिकाणी माल आणायला जाताना व्यवसायातली तडजोड व चतुराई त्यांनी अंगीकारले. पण नागपुरात राहणे सोपे नव्हते. पैसा वाढवणे इतके सहज नव्हते. पण 'माझे दोन हात व माझी बुद्धी हेच खरे माझे वैभव' या तत्त्वाने मेहनतीला तसूभरही कमी होऊन दिले नाही. शिवाजीनगर सारख्या झोपडपट्टीत राहून त्यांच्या सहचारिणी मंगला राऊत यांच्यासोबत संसार सुरू करून अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन काढले. तिन्ही मुलांनी झोपडपट्टीतच जन्म घेतला. शिवाजीनगरच्या झोपडपट्टी वीज, पाणी, शौचालय, रस्ते अशा सुविधा नव्हत्या. तशाही परिस्थितीत घरीसुद्धा इअर रिंग, बिऱ्या, टापसे रेडिओची गाणी ऐकत परिस्थितीची जाणीव न होऊ देता काम दिवस-रात्र सुरू ठेवले. कधी या दुकानाची चाकरी तर कधी त्या दुकानाची. पण ज्या दुकानात उभे राहिले त्या दुकानात गिऱ्हाईक देविदास राऊत यांच्या कुशल कौशल्याने आकर्षित होऊन व्यवसाय जोमात राही. पण तत्व मात्र कायम कधीही कुणाला फसवायचे नाही, प्रामाणिक राहून प्रयत्न सुरू ठेवायचे. बुद्धांचे तत्त्वज्ञान कधीही विसरायचे नाही हा सतत प्रयत्न असायचा. मग जिथे हे तत्त्वज्ञान असेल तिथे यश नक्कीच येते आणि मग शंभर रुपये महिन्याने पहिले फुटपाथ वरील 3 बाय 25 फुटाचा रस्ता असलेली जागा विकत घेतली. या छोट्याशा जागेवर दहा वर्ष त्यांचा भाऊ, नौकरांच्यासोबत व्यवसाय केला. कधी मुंबई, कधी हैदराबाद, कधी कलकत्ता तिथून व्यवसायासाठी लागणारा माल ते विकत आणत. त्यानंतर दुकानाच्या आजूबाजूची दुकाने, गोदामासाठी जागा, बोहरा मज्जिदचे दुकान त्यानंतर हा प्रवाह निरंतर सुरूच राहिला. मोठा मुलगा प्रशांत याने प्रथम देविदासजीचे कौशल्य आत्मसात केले. अनेक प्रकारच्या ज्वेलरी, पिचकाऱ्या, राख्या, कॉस्मेटिक सर्व प्रकारचा माल आणायला लागले. ठेवायला जागा कमी पडायला लागली. कालांतराने व्यापार वाढायला लागला आणि मग आजूबाजूची दुकानेसुद्धा त्यांनी विकत घेतली आणि बोहरा मज्जिद जागेवर गोडाऊन बांधून चार मजली दुकान 2014 ला भंते आर्य नागार्जून सुरई ससई हस्ते उद्घाटनाने केले. इतवारातील राऊत इमिटेशन ज्वेलरी आज दिमाखात उभी आहे. राखी व्यवसायात महाराष्ट्रातून राऊत दुकान अग्रेसर आहे. 45 वर्ष हा व्यवसाय स्वतःच्या ताकदीवर, बुद्धीवर व मेहनतीवर त्यांनी उभा केला. 2013 पासून धम्म प्रचारासाठी स्वतःला वाहून घेतले. त्यांची अडीच हजाराच्यावर व्याख्याने, हजाराच्या वर बिजनेस वर व्याख्यान तसेच अनेक पुस्तके प्रकाशित आहेत. धम्मपद या पुस्तकाला फार मागणी आहे. आज प्रशांत दिनेश व कोमल त्यांची तीन मुले त्यांचा व्यवसाय यशस्वीरित्या सांभाळता. महाराष्ट्रातच नाही तर भारतात व इतरत्र ठिकाणी त्यांचा व्यवसाय वाढवण्याचा प्रयत्न करतात. देविदास राऊत यांनी बहुजन समाजात व्यवसाय निर्मिती कशी असायला हवी याबाबत स्वतःचा एक आदर्श निर्माण केलेला आहे. व्यावसायिक क्षेत्रात समोर जाण्याची गरज आहे आणि त्यासाठी देविदास राऊत यांचे कष्ट व संयम याचा बोध सर्वांनी घ्यायला हवा. आमच्याकडून त्यांना त्यांच्या व्यवसाया क्षेत्रात भरभराट होवोत याच सदिच्छा तसेच बोधाचार्य देविदास राऊत यांच्या 78 व्या वाढदिवसानिमित्त बहुजन सौरभकडून हार्दिक हार्दिक शुभेच्छा..●●



प्रीती तिरपुडे
7972119871



देविदास राऊत

# स्वप्नच !

ओळखलेस..?' त्याचा प्रश्न.
'नाही...' माझे कोरडे उत्तर
'मी पाऊस..' तो नम्रपणे बोलला आणि मी सावरून बसलो.
'का छळतोस एवढा?'
'कोण मी?'
'तू नाही तर कुणाला म्हणतो आहे. माझ्या समोर तर तूच आहेस. हे बरे आहे तुम्हा माणसांचे. स्वतःचे दोष झाकायचे, स्वतःच्या कृत्याकडे दुर्लक्ष करायचे आणि त्रास होत असला की दोष इतरांवर ढकलून नामानिराळे व्हायचे. ही चलाखी फार जमते रे तुमच्या माणूस जातीला.' त्याचा स्मित मिश्रित थेट वार घायाळ करुन गेला.
'ठीक आहे, आम्ही चुकलो असू, आहोच आम्ही स्वार्थी, अप्पलपोटी जमात. पण, म्हणून काय एवढ छळायाच.' माझा केविलवाण्या स्वरात प्रतिवाद. 'होतो ना त्रास! मग सृष्टीतील जंगले ओरबाडतांना विचार करायचा नव्हता? तेंव्हा तुमची भौतिक सुखाची लालसा कशी तुम्हांला स्वस्थ बसू देत नाही. सांग तू, जिथे राहतोस त्याच्या आसपास एखादा तरी विशाल वृक्ष आहे काय? स्वतःच्या सुखासाठी वृक्ष तोडताना एक क्षण तरी विचार केला होतास कधी...की मला सावली तरी कुठे मिळू शकेल? तुमच्या कृत्याची फळ पदरात पडत आहे आणि दोष मात्र माझ्यावर.' तो छद्मी हसत आहे याचा भास झाला.' तुझी तक्रार अगदी रास्त आहे. दोषही स्वीकारतो. पण, माझ्या कृत्याची शिक्षा त्या धरती मातेला का देतो आहेस? आम्ही शहरवासियांनी तुझे अतोनात नुकसान केले. पण, त्या बळीराजाने तुझे काय बिघडवले? बघ, तुझ्या येण्याकडे कसा डोळे लावून बसला आहे. तू बरसत नाहीस म्हणून त्याच्या डोळ्यातील संततधार थांबत नाही. त्याला कुटुंबाची चिंता पोखरून काढत आहे. किमान त्याच्यावर तरी करुणा दाखव.' माझा आर्जवी स्वर. तो खळखळून हसत म्हणाला, 'अच्छा त्याच्या आडून आता तू मला भावनिक करू नकोस. त्याच्या स्थितीची मला जाण आहे. माझे आणि त्याच, शेतीचे नाते हजारो वर्षाचे आहे. तो नव्हता रे तुमच्या शहरवासीयांसारखा ओरबाडणारा. त्याला जे मिळायचे त्यात समाधानी होता. प्रगतीसाठी धडपडतो. पण, इतरांना ओरबाडून त्याला नको असते काही.' थोडे थांबून 'श्रम पडणार नाहीत अश्या सुविधा देणाऱ्या मशिन्स तुम्ही माणसांनी निर्माण केल्यात. झाडांची कत्तल करून आलिशान कोठ्या, घरे उभारले. काय तुमच्या धूर ओकणाऱ्या गाड्या, थोडी ऊन वाढली म्हणून एसी काय काय नाही उपयोगात आणत तुम्ही. त्याचा माझ्या नैसर्गिक आगमनावर परिणाम होऊ शकतो याचा सांग कधी विचार केला आहेस.
सांग ना केला आहेस?' त्याचा दरडावणीचा सूर असल्याचे माझ्या लक्षात आले.
त्याच्या आरोपात तथ्य असल्याने मी तरी काय उत्तर देऊ शकणार होतो. मी खजील होतो. आपल्याच कर्माची फळे पदरात पडत आहेत याचे तो भान देत होता. मी अतिशय विनम्र स्वरात त्याला बोलून गेलो, 'तुझे सगळे आरोप मान्य आहेत. तू येण्यासाठी उशीर केलास त्याकाळात मिळालेली शिक्षा मला वाटते पुरेशी आहे. माय माउल्या तुझ्यासाठी वणवण भटकत आहेत किमान याचा तरी विचार कर.'
'अच्छा आपल्याला जेव्हा झळ पोहोचते तेंव्हाच माणुसकीची जाणीव कशी होते रे तुम्हांला? एरवी तर तुम्ही राग, द्वेष, ईर्षा, मोहानेच ग्रस्त असता.
कधी बसून विचार करता निसर्गात काय होते आणि आता काय उरलेय. माणसांची कदाचित ही शेवटचीच पिढी असल्यागत तुमचे वागणेच तुम्हाला त्रासदायक बनत चालले आहे. त्याची जाण मात्र तुम्हाला नाही. कधी विचार केलास पुढच्या पिढ्यांचा. त्यांच्यासाठी निसर्ग कसा उरेल?' त्याचे शब्द भाल्यासारखे टोचत होते. मी हवालदिल होऊन एखाद्या गुन्हेगारासारखा त्याचे आरोप ऐकत होतो. त्याचेही बरोबरच तर होते. वेळीच सावध व्हा असेच तर तो सांगत होता. माझे विचारचक्र चालू असतांनाच विज कडाडण्याचा आवाज आला. दचकून जागा झालो. स्वप्न भंगले होते. बाहेर बघितले तर आभाळात ढगांनी दाटी केली होती. मी मनातच त्याचे आभार मानले.●●





अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

# “सृजनशीलतेचा समीक्षात्मक पुष्पगुच्छ”

मा. प्रणोतीताई यांच्या ‘चैतन्यझरा’ आणि ‘स्मृतिगंध’ या दोन पुस्तकांचे प्रकाशन ११ जून २०२५ रोजी त्यांच्या जन्मदिनी पार पडले. जन्मदिवस आणि पुस्तक प्रकाशनाचा दुग्धशर्करा योग जुळून आल्याने हा सोहळा मान्यवर व आप्तेष्टांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. प्रणोतीताईंनी उपस्थितांना पुस्तके भेट देऊन त्यावर काहीतरी लिहिण्याचा आग्रह केला. त्या प्रेमळ आग्रहातून अनेक कवी, कवयित्री, लेखक, लेखिका तसेच प्रथमच लेखन करणाऱ्यांनीही या दोन्ही पुस्तकांवरील आपापले मनोगत व्यक्त केले. त्या सर्व समीक्षणांचे संकलन म्हणजे ‘चैतन्यस्मृतींचा सौंदर्यबोध’ हा समीक्षाग्रंथ होय. ‘चैतन्यझरा’ मधील चैतन्य आणि ‘स्मृतिगंध’ मधील ‘स्मृती’ या शब्दांपासून तयार झालेल्या शीर्षकातूनच ग्रंथाचा आशय स्पष्ट होतो. या ग्रंथाचे मुखपृष्ठ अत्यंत आकर्षक आहे. पिवळा रंग तेज, आशा आणि नवचैतन्याचे प्रतिक आहे, तर काळ्या रंगातील दोन पुस्तकांचे चित्र अंधारातून उगवणाऱ्या शब्दप्रकाशाचे प्रतिक ठरते. स्मृतींचा गंध, शब्दांचा झरा आणि नव्या साहित्यप्रवासाची आशावादी दिशा या मुखपृष्ठातून प्रभावीपणे व्यक्त होते. ‘चैतन्यझरा’ या काव्यसंग्रहात जीवनातील विविध अनुभव, निसर्ग, नाती, सामाजिक जाणीवा आणि सकारात्मक विचारांचे चैतन्य अनुभवास येते. ‘स्मृतिगंध’ या लेखसंग्रहात लेखिकेने जीवनातील गोड-कडू अनुभव, आठवणी आणि व्यक्ती-प्रसंग यांचे संवेदनशील चित्रण केले आहे. या दोन्ही साहित्यकृतींच्या विविध पैलूंना उजाळा देणारा हा समीक्षाग्रंथ वाचकांसाठी मार्गदर्शक ठरतो. या ग्रंथाच्या संपादक म्हणून सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका, समाजसेविका आणि ‘पोरी जरा जपून’ फेम मा. प्रा. विजयाताई मारोतकर लाभल्या आहेत, ही या ग्रंथाची मोठी जमेची बाजू आहे.

एकूण ४२ समीक्षकांनी या ग्रंथात आपले मनोगत नोंदविले आहे. संपादकीयात त्यांनी जीवनाचे तत्त्वज्ञान मांडताना, आयुष्याच्या सारीपाटावर योग्यवेळी योग्य चाल खेळली तरच यश प्राप्त होते, हा विचार अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केला आहे. अर्पणपत्रिकेत लेखिकेने आपल्या आई आणि सासूबाई या दोघींनाही समान आदराने स्थान दिले आहे. त्यातून तिचा कृतज्ञ, समतोल आणि प्रेमळ स्वभाव अधोरेखित होतो.
‘लेक लाडकी आईची,
सून सासूची गुणाची;
नाते बांधले प्रेमाने,
आस नव्हती धनाची.
डॉ. वीणा राऊत यांनी लेखिकेच्या कृतज्ञतेच्या भावनेचे विशेष कौतुक केले असून कुटुंब, मैत्री, निसर्ग आणि नातेसंबंध यांचे जतन तिच्या लेखनातून होत असल्याचे नमूद केले आहे. डॉ. सुनंदा जुलमे यांनी व्यक्तिचित्रण हा लेखिकेचा विशेष गुण असल्याचे सांगत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, सावित्रीबाई फुले, स्वामी विवेकानंद, राष्ट्रमाता जिजाऊ, आशा भोसले आणि शांता शेळके यांच्यावरील लेखांचा उल्लेख केला आहे. डॉ. स्मिता मेहेत्रे यांनी “धन्य ती कवित्वकळा” असे गौरवोद्गार काढत लेखिकेला आई-वडिलांकडून मिळालेल्या साहित्यसंस्कारांचे कौतुक केले आहे. सरोज अंदनकर यांच्या मते तिच्या कविता आत्मविश्वास वाढविणाऱ्या आहेत, तर प्राचार्या उज्ज्वला अंधारे यांच्या मते त्या मनात प्रेमाचा ओलावा निर्माण करतात. डॉ. लीना निकम यांनी या दोन्ही पुस्तकांना विचार, भावना आणि अनुभवांची सुंदर पुष्पगुंफण म्हटले आहे. डॉ. सागर गुडमेवार यांना ‘स्मृतिगंध’ मधून सुमनांचा मंद सुगंध जाणवतो. अपर्णाताईंना त्यात मानवतावादी विचारांचा प्रभाव दिसतो. पल्लवी उमरे यांच्या मते या कविता निराशेतून बाहेर काढून आशावाद देतात, तर श्रद्धा बुरले यांना त्या वास्तवाचे धडे देणाऱ्या वाटतात. विकास गजापुरे यांनी स्त्रीवादी जाणीवा अधोरेखित केल्या असून अरुणाताई भोंडे यांच्या मते हा काव्यसंग्रह मन चैतन्याने भरून टाकतो. डॉ. माधव शोभणे यांनी इतरांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यातील खरा आनंद अधोरेखित केला आहे. डॉ. भारती खापेकर यांनी परिवर्तनवादी विचारांचे कौतुक केले, तर विद्या निनावे यांनी अंधश्रद्धा, रूढी-परंपरा आणि कुटुंबवत्सल भाव व्यक्त करणाऱ्या लेखनाची प्रशंसा केली आहे. डॉ. शील बागडे यांच्या मते भावना, संवेदना, धार्मिक विचार आणि जीवनतत्त्वज्ञान यांचा सुंदर संगम या कवितांमध्ये दिसतो. निमा बोडखे यांनी ‘पाहुणी की आश्रित’ या लेखातील स्त्रीमनाची वेदना अधोरेखित केली आहे. प्रा. डॉ. गोपाल चव्हाण यांच्या मते ‘स्मृतिगंध’ मधील लेख प्रबोधनात्मक असून त्यात लेखिकेचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होते. मंदाताई खंडारे यांनी तिला “हळव्या मनाची संवेदनशील कवयित्री” अशी उपमा दिली आहे. गोविंद साल्पे यांनी अंधश्रद्धामुक्त समाजाचा संदेश महत्त्वाचा असल्याचे नमूद केले आहे. मोनाली पोफरे यांना मराठी भाषेचा अभिमान व्यक्त करणारी कविता आवडली, तर साधना काळबांडे यांनी काव्यसंग्रह आशयसमृद्ध व दर्जेदार असल्याचे म्हटले आहे. डॉ. काळे यांनी लेखिकेचा सकारात्मक आणि तात्त्विक दृष्टिकोन अधोरेखित केला आहे. जयश्री धात्रक यांनी ‘स्मृतिगंध’ला विविध विषयांच्या लेखांची पुष्पमाला म्हटले आहे. जया काकडे, विलास गजभिये, विजयाताई ब्राह्मणकर, डॉ. तुषार झाडे, माधुरी मते आणि घनश्याम कातोरे यांनीही लेखिकेच्या लेखनातील विविध गुणांचे मनापासून कौतुक केले आहे. डॉ. ऋतुजा गोमासे यांनी ‘अभिमान’ या लेखातून आपल्या आईविषयीचा कृतज्ञ भाव व्यक्त केला आहे. शिक्षकी पेशामुळे स्वतःचा साहित्यछंद जोपासण्यास वेळ न मिळालेल्या आईने सेवानिवृत्तीनंतर लेखनात स्वतःला वाहून घेतले आणि स्वतंत्र ओळख निर्माण केली. तिच्या त्यागामुळेच आम्ही घडलो, ही भावना त्यांनी अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत व्यक्त केली आहे. शेवटी या ग्रंथाविषयी एवढेच म्हणावेसे वाटते -
‘चैतन्यस्मृतींचा सौंदर्यबोध,
नावासम सुंदर समीक्षाग्रंथ;
जीवनाचा दडला खरा अर्थ,
वाहे ज्ञाननदी शांत, थोडी संथ.’
हा ग्रंथ प्रत्येक साहित्यप्रेमीने अवश्य वाचावा असा आहे. प्रणोतीताई यांनी आजवर चार पुस्तके प्रकाशित केली असून त्यांना आठ पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांच्या लेखणीतून यापुढेही अधिक दर्जेदार, प्रेरणादायी आणि समाजप्रबोधन करणारे साहित्य निर्माण व्हावे, अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव व्हावा आणि त्यांचा साहित्यप्रवास अधिक समृद्ध होत राहावा, हीच मनःपूर्वक शुभेच्छा.●●






डॉ.शील बागडे
मो.९८२३९६३११५

# शीलाच्या आत्महत्येला जबाबदार कोण?

आज सकाळपासूनच मन अस्वस्थ होते. एक अनामिक भीती सतत मनात घर करून बसली होती. कामात मन रमवण्याचा प्रयत्न करत असतानाच फोनची रिंग वाजली. क्षणभर फोन उचलावा की नाही, असा विचार मनात आला. दुसऱ्यांदा फोन वाजताच मी तो उचलला.
‘हॅलो... कोण बोलतेय?’
पलीकडून रडवेला आवाज आला. ‘मी संजना बोलतेय...’
‘अगं, एवढी रडतेस का? काय झाले?’
ती हुंदके आवरत म्हणाली, ‘आपली मैत्रीण शीला... ती आता या जगात नाही.’
क्षणभर माझ्या पायाखालची जमीन सरकली.
‘काय? कसे काय?’
संजना म्हणाली, ‘तिचा नवरा तिला खूप त्रास द्यायचा. काही दिवसांपूर्वी एका लग्नात आमची भेट झाली होती. तेव्हा तिने तिच्या आयुष्याची वेदनादायी कहाणी मला सांगितली होती.’ ती पुढे सांगू लागली - ‘लग्नात एक ओळखीचा चेहरा दिसला. सुरुवातीला मी ओळखलेच नाही. जवळ येऊन ती म्हणाली, 'संजना, मी शीला.' मी तिच्याकडे पाहतच राहिले. कॉलेजमध्ये सुंदर, हसतमुख असणारी शीला अकाली म्हातारी दिसत होती. चेहरा काळवंडलेला, डोळ्यांत वेदना आणि निराशा स्पष्ट दिसत होती.
मी विचारले, 'कशी आहेस?'
ती म्हणाली, 'सगळे ठीक आहे,' पण तिच्या डोळ्यांनी वेगळीच कहाणी सांगितली. मी पुन्हा विचारताच ती ढसाढसा रडू लागली. मी तिला बाजूला नेलें
'शीला, काय झाले?'
ती म्हणाली, 'संजना, माझा नवरा मला रोज मारहाण करतो. दुसऱ्या बाईला घरात आणले आहे. मला घर सोडून जाण्यास सांगतो.'
'पण का?'
'कारण मला मूल होत नाही. लग्नाला दहा वर्षे झाली. किती डॉक्टर, किती नवस केले; पण काहीच उपयोग झाला नाही. सुरुवातीची दोन वर्षे खूप सुखात गेली. नंतर नवरा दारू पिऊन यायला लागला. माझ्या वडिलांकडे पैशांची मागणी करू लागला. माझ्या सुखासाठी वडिलांनी आयुष्यभराची कमाई त्याच्यावर खर्च केली, पण त्याची हाव संपली नाही.' शीला पुढे म्हणाली, 'माझा छळ पाहून वडिलांना हृदयविकाराचा झटका आला आणि ते गेले. त्यांच्या दुःखाने आईही वर्षभरात गेली. आता माझे म्हणावे असे कोणीच उरले नाही.' तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. 'सासरचे मला ‘वांझोटी’, ‘पांढऱ्या पायाची’ म्हणून हिणवतात. कोणत्याही शुभकार्यात सहभागी करून घेत नाहीत. माझे अस्तित्वच त्यांना नकोसे झाले आहे.'
तिचे शब्द ऐकून माझेही डोळे पाणावले. कॉलेजमध्ये सर्वांना मदत करणारी, हुशार आणि समजूतदार शीला इतक्या मोठ्या वेदना एकटी सहन करत होती. मी तिचा हात हातात घेत म्हणाले, 'हिम्मत हरू नकोस. अजूनही उपचार शक्य आहेत.' मी तिला एका नामांकित डॉक्टरांचा पत्ता दिला. तो हातात घेताच तिच्या चेहऱ्यावर आशेचे हास्य उमटले.
ती आनंदाने म्हणाली, 'मला पण मूल होईल ना? मी पण आई होणार ना?'
मी म्हणाले, 'नक्की प्रयत्न कर.'
ती आनंदाने निघून गेली. तीच आमची शेवटची भेट ठरली.
आज तिच्या नातेवाईकांकडून कळले... तिने आत्महत्या केली.’
संजना रडत होती. माझ्याही डोळ्यांत अश्रू आले. मी शांतपणे म्हणाले, ‘शीलाचा मृत्यू हा केवळ एका स्त्रीचा मृत्यू नाही; तो समाजाच्या विकृत मानसिकतेचा बळी आहे.’
फक्त आई होऊ शकत नाही म्हणून एका स्त्रीला दोषी ठरवणे कितपत योग्य आहे? अपत्य न होण्यात स्त्री किंवा पुरुष दोघांपैकी कोणाचाही वैद्यकीय कारणांमुळे सहभाग असू शकतो. तरीही दोष मात्र नेहमी स्त्रीलाच दिला जातो. तिचा अपमान केला जातो, मानसिक आणि शारीरिक छळ केला जातो. जर शीलाला प्रेम, आधार आणि सन्मान मिळाला असता, तर कदाचित ती आज जिवंत असती. मूल होत नसेल तर आधुनिक वैद्यकशास्त्रात अनेक उपचार उपलब्ध आहेत. दत्तक हा पर्यायही तितकाच सुंदर आहे. एका अनाथ मुलाला कुटुंब मिळू शकते आणि एका दांपत्याला पालकत्वाचा आनंदही. शीला स्वतः सुशिक्षित होती. ती स्वतःच्या पायावर उभी राहू शकली असती. पण सततचा अपमान, एकटेपणा आणि मानसिक छळ यामुळे तिची जगण्याची इच्छाच संपली. आज प्रश्न एका शीलाचा नाही. अजून किती स्त्रिया अशाच मानसिक अत्याचाराला बळी पडत आहेत? एखाद्या स्त्रीची ओळख केवळ मातृत्वानेच ठरत नाही. तिचे व्यक्तिमत्त्व, शिक्षण, कर्तृत्व आणि माणूस म्हणून असलेले अस्तित्वही तितकेच महत्त्वाचे आहे. समाजाने, कुटुंबाने आणि विशेषतः पतीने स्त्रीला सन्मान, आधार आणि समजून घेण्याची गरज आहे. मानसिक छळ हा देखील हिंसाचाराचाच एक प्रकार आहे. तो वेळेत थांबवला, तर अनेक शीलांचे आयुष्य वाचू शकते. प्रत्येक माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. तो हिरावून घेण्याचा अधिकार कोणालाच नाही. म्हणूनच आज गरज आहे ती स्त्रीकडे दोषी म्हणून नव्हे, तर माणूस म्हणून पाहण्याची. समाजाची मानसिकता बदलली, तर पुन्हा कोणत्याही शीलाला अशा वेदनादायी शेवटाला सामोरे जावे लागणार नाही.●●





ज्योत्स्ना बनसोड
8766942982

05 July 2026 page 04_Layout 1 7/4/2026 6:23 PM Page 1



## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - १९४

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा मसली पुनर्वसन ता. कुही जि.नागपूर.



कुही तालुक्यातील मसली हे गाव शेतकरी व्यवसायातील प्रसिद्ध गाव आहे. या परिसरात काही अंतरावर करंडा अभयारण्य असून उमरेड आणि कुही जवळचे तालुके आहेत. शेती, शेतकरी, शेतमजूर या परिसरात मोठ्या प्रमाणावर आहेत. गावातील लोक येथे विविध मोठे कार्यक्रम दिनविशेषाला घेत असतात.

संवाद मित्र
कपिल नारनवरे
मो.9370773608

# डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांच्या 'उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम' पुस्तकाचे आज प्रकाशन



**नागपूर :** प्रसिद्ध आंबेडकरी कवी व लेखक प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मुरलीधर मेश्रामद्वारा संकलित-संपादित 'उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम' या पुस्तकाचे प्रकाशन रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी सायं. ५.३० वा. विदर्भ हिंदी साहित्य संमेलन, अर्पण सभागृह, पहिला माळा, मोरभवन, सीताबर्डी, नागपूर येथे होणार आहे. संविधान फाऊंडेशन नागपूरद्वारा आयोजित पुस्तक प्रकाशन समारंभ माजी सनदी अधिकारी तथा संविधान फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष इ. झेड. खोब्रागडे, भाप्रसे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार असून प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ नाटककार तथा आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर अँड लिटरेचरचे अध्यक्ष दादाकांत धनविजय हे प्रामुख्याने उपस्थित राहतील. अ.भा. गौर बंजारा साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष डॉ. प्रकाश राठोड व प्रसिद्ध आंबेडकरी लेखक डॉ. अनमोल शेंडे हे या पुस्तकावर भाष्य करणार आहेत. स्तंभ पब्लिशिंग हाऊस, चंद्रपूरचे प्रकाशक कवी अविनाश पोईनकर व कवी सुरज दहागावकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील. सेवादल महिला महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. सुशील मेश्राम हे कार्यक्रमाचे संचालन करतील. पुस्तक प्रकाशन सोहळ्यास साहित्यप्रेमी नागरिकांनी मित्र-परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती संविधान फाऊंडेशनच्या रेखा खोब्रागडे, छाया मेश्राम, दिपक निरंजन, विजय बेले, दिगांबर गोंडाणे, नेहा खोब्रागडे, निर्जरा मेश्राम यांनी केली आहे.

# ॲड. बिहारी कांबळे जन्मशताब्दी दिनानिमित्त माजी विद्यार्थ्यांचा तथा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**ब्रह्मपुरी :** समाजातील गरिबांना उन्नत आणि प्रगती करायची असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे साधन आहे. हे हेरून ॲड. बिहारी कांबळे यांनी नान्होरीसारख्या खेड्यात गरिबांसाठी 1960 ला शिक्षणाचे दरवाजे खुले केले असे प्रवीण खोब्रागडे यांनी सांगितले. बिहारी कांबळे यांच्या जन्मशताब्दी सोहळ्यात उद्घाटक म्हणून बोलत होते. ब्रह्मपुरी तालुक्यातील नान्होरी येथे दि. २ जुलै २०२६ला सिद्धार्थ विद्यालय नान्होरीचे संस्थापक ॲड. बिहारी रामजी कांबळे यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आनंद बिहारी कांबळे, उद्घाटक अ.भा. रिपब्लिकन पक्ष चे अध्यक्ष प्रवीण उर्फ बाळू खोब्रागडे चंद्रपूर, तर प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य डॉ. सिद्धार्थ मेश्राम नांदुरा, प्रा. सुजाता बुंदेले, प्रा. डॉ. देवेश कांबळे, रिपब्लिकन पक्षाचे नेते अशोक निमगडे चंद्रपूर, ज्येष्ठ पत्रकार नेताजी मेश्राम, जीवन बागडे, प्राचार्य डॉ. राजेश कांबळे, माजी मुख्याध्यापक एस. एस. नगराळे, माजी मुख्याध्यापिका मंगर, ममता अजय कांबळे, प्रा. मुकेश रामटेके, डॉ. मिलिंद रंगारी, रितिक संजय कांबळे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी ॲड. बिहारी कांबळे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी सिद्धार्थ विद्यालय नान्होरी येथील गुणवंत विद्यार्थी साहील बबन कोलते, वेदांती मिसार, मंजु देशमुख, अक्षरा मेश्राम व सिद्धार्थ विद्यालय नान्होरीचे नावलौकीक करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा, माजी मुख्याध्यापकांचा आणि ॲड. बिहारी कांबळे यांच्या आप्तेष्टांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. सिद्धार्थ विद्यालय नान्होरी येथे झालेल्या कार्यक्रमात ॲड. बिहारी कांबळे यांचे आप्तेष्ट, सिद्धार्थ विद्यालयाचे शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी व गावकरी मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन इंजिनियर संजय कांबळे, ममता अजय कांबळे आणि सिद्धार्थ विद्यालयाचे वतीने आयोजन केले होते. कार्यक्रमाचे संचालन अर्चना नाईक, मुख्याध्यापक भोजराज खोब्रागडे तर आभार प्रदर्शन अभिनीत गेडाम शिक्षक यांनी केले.

## महत्वाचे

### राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त निमा नागपूर तर्फे रविवारी सत्कार व सीएमई सत्र

**नागपूर :** नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) नागपूर शाखेतर्फे राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त रविवारी, ५ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता नंदनवन येथील केडीके अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञांचा सत्कार व विशेष सीएमई (सतत वैद्यकीय शिक्षण) प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ख्यातनाम हृदयरोगतज्ज्ञ डॉ. प्रमोद मुंडडा हे 'उच्च रक्तदाब आणि त्याचे व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाला निमा केंद्रीय व राज्य पदाधिकाऱ्यांसह नागपूर शाखेचे अध्यक्ष डॉ. नितीन कान्होलकर, सचिव डॉ. शरद ठाकूर, कोषाध्यक्ष डॉ. पंकज थूल व इतर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या विशेष कार्यक्रमाला नागपूर व परिसरातील सर्व आयुष व एकात्मिक वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निमा नागपूर शाखेतर्फे करण्यात आले आहे.

### गोंदिया विमानतळावरील रनवे विस्ताराच्या कामात कोट्यवधींचा गैरव्यवहार!

**नागपूर :** गोंदिया येथील बिरसी विमानतळावर 'धावपट्टी' विस्तारात झालेल्या कोट्यवधींच्या कथीत गैरव्यवहार प्रकरणात केंद्रिय गुन्हे अन्वेषण विभागाच्या नागपूर पथकाने शनिवारी मोठी कारवाई केली. या कामात झालेला गैरप्रकार आणि 'डीव्हीओआर' यंत्रणेसाठीच्या 'ऑपरेशनल बाउंडरी'च्या (परिचालन सीमा) बांधकामात गुन्हेगारी स्वरूपाचे गैरवर्तन, फसवणूक आणि कागदपत्रांमध्ये फेरफार झाल्याची माहिती समोर आल्यानंतर सीबीआयच्या भ्रष्टाचार विरोधी पथकाने दोन अधिकारी आणि अन्य जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

यात केंद्रीय अन्वेषण विभागच्या नागपूर येथील भ्रष्टाचार विरोधी पथकाने गोंदिया येथील बिरसी विमानतळावरील स्थापत्य कामांमधील कथित अनियमिततेप्रकरणी 'भारतीय विमान प्राधिकरणाचे'चे सहाय्यक महाव्यवस्थापक (अभियांत्रिकी-स्थापत्य) संजीव कुमार सिंग, मध्य प्रदेशातील बालाघाट येथील 'मेसर्स रायसिंग अँड कंपनी' यांच्यासह इतर सरकारी अधिकारी व खाजगी व्यक्तींचा समावेश आहे.

### हाऊसिंग सोसायट्यांचे नियम बदलले!

**नागपूर :** तुमच्या हाऊसिंग सोसायटीत मेंटेनन्स कसा ठरणार? फ्लॅटधारकाच्या मृत्यूनंतर वारसाला मालकी कशी मिळणार? सोसायटीचा फंड कसा तयार होणार? पार्किंग चार्जेस किंवा नॉन-ऑक्युपन्सी चार्जेस कसे आकारले जाणार? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आता नव्या नियमावलीत देण्यात आली आहेत. राज्य सरकारने सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी स्वतंत्र नियम लागू करत सोसायट्यांच्या कारभारात मोठे बदल केले आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मध्ये सुधारणा करून हाऊसिंग सोसायट्यांसाठी स्वतंत्र प्रकरण समाविष्ट करण्यात आले आहे. सोसायटीची नोंदणी, सदस्यत्व, नॉमिनेशन, वारस नोंद, चार्जेस, फंड आणि दैनंदिन प्रशासनासाठी स्पष्ट प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे आतापर्यंत अनेक मुद्द्यांवर निर्माण होणारा संभ्रम कमी होण्याची अपेक्षा आहे.

नवीन सोसायटी स्थापन करताना प्रथम नाव आरक्षित करून बँक अकाउंट उघडण्याची परवानगी घ्यावी लागेल. त्यानंतर दोन महिन्यांच्या आत रजिस्ट्रेशनसाठी अर्ज करावा लागणार आहे. निबंधकांना अर्जावर ३० दिवसांत निर्णय देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच सदस्य होण्यासाठी रजिस्टर्ड सेल ॲग्रीमेंट किंवा इतर वैध कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

फ्लॅटधारकाच्या मृत्यूनंतर नॉमिनी, कायदेशीर वारस आणि फॅमिली अरेंजमेंटच्या आधारे मालकी हस्तांतरणाची सविस्तर प्रक्रिया नियमांमध्ये स्पष्ट करण्यात आली आहे. वारसांमध्ये वाद असल्यास सोसायटी थेट ट्रान्सफर करू शकणार नाही. अशा वेळी वारसा प्रमाणपत्र किंवा सक्षम न्यायालयाचा आदेश आवश्यक राहील.

या नियमांतील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे सोसायटीच्या आर्थिक व्यवस्थापनासाठी घालून दिलेली नवी चौकट. प्रत्येक सोसायटीला रिपेअर फंड, मेजर रिपेअर फंड, सिंकिंग फंड, एज्युकेशन अँड ट्रेनिंग फंड, इलेक्शन फंड आणि वेल्फेअर फंड तयार करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### दिवाकरराव मोते



**नागपूर:** महाल येथील संघ बिल्डिंगजवळ राहणारे माजी सैनिक दिवाकररावजी रामाजी मोते यांचे शुक्रवार, दि.३ जुलै रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्यावर अंत्यसंस्कार गंगाबाई घाट येथे करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार पुत्र, सुना, नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे.

# सेलू-कळमेश्वर टोल नाका त्वरित बंद करा, अन्यथा आंदोलन; आरपीआयचे हर्षवर्धन ढोके यांचा इशारा

**कळमेश्वर:** 'वाहन खरेदीच्या वेळीच सरकार सर्व प्रकारचा रस्ते वाहतूक कर वसूल करत असतानाही टोल नाक्यांच्या नावाखाली जनतेची सर्रास लूट केली जात आहे. रस्ते वाहतूक विनामूल्य उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे,' अशी घणाघाती टीका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (RPI) राष्ट्रीय प्रवक्ते हर्षवर्धन ढोके यांनी केली आहे. सेलू-कळमेश्वर टोल नाक्यावरील नागरिकांची पिळवणूक त्वरित थांबवून हा टोल नाका कायमचा बंद न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि प्रशासनाला दिला आहे. सध्या कळमेश्वर-सेलू टोल नाक्याने स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांच्या नाकात दम आणला आहे. येथील कर्मचाऱ्यांचे वर्तन अत्यंत उद्धट असून, ते पास देताना लोकांवर उपकार करत असल्याच्या भाषेत बोलतात. नियमानुसार किमान तीन महिन्यांचा पास देणे शक्य असताना, दर महिन्याला प्रवाशांना मुद्दाम रांगेत उभे केले जाते. आजच्या डिजिटल युगातही हा टोल नाका ऑनलाईन पास देण्यास सक्षम झालेला नाही. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, वैध पास असतानाही वाहनधारकांच्या 'फास्टॅग' (FASTag) मधून परस्पर पैसे कापले जात आहेत आणि पैसे भरूनही नागरिकांना पावती दिली जात नाही. टोल नाक्याच्या नियमांची पायमल्ली करत अवघ्या १ किलोमीटर अंतरावर राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांकडूनही येथे सक्तीने टोल वसूल केला जात आहे. चांगल्या रस्त्यांच्या नावाखाली सुरू असलेली ही लूटमार आता सहन केली जाणार नाही. परिसरातील नागरिक, शेतकरी आणि नोकरदारांचे हे अतोनात हाल पाहता, सेलू-कळमेश्वर टोल त्वरित बंद करण्यात यावा, अन्यथा आरपीआय जनतेच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरून उग्र आंदोलन करेल, असा इशारा हर्षवर्धन ढोके यांनी दिला आहे.

# मोरभवन बस डेपोमधील खड्डे बुजविण्याचे मनपा आयुक्तांचे निर्देश



**नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या सीताबर्डी येथील 'आपली बस'च्या मोरभवन बस डेपोची मनपा आयुक्त डॉ. विपीन आणि परिवहन समिती सभापती मंगला खेकरे यांनी शनिवारी (ता.4) संयुक्त पाहणी केली. यावेळी मनपा आयुक्तांनी ताबडतोब डेपोमधील खड्डे बुजविण्याचे निर्देश दिले. या पाहणी दौऱ्यात नगरसेवक सुधीर (बंडू) राऊत, विजय होले, नगरसेविका पूजा पाठक, अतिरिक्त आयुक्त अंकित, प्र. अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे, ऑपरेशन व्यवस्थापक राजीव घाटोळे, चलो प्रोजेक्टचे अजय कुमार, बस ऑपरेटर्स यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या पाहणीदरम्यान मनपा आयुक्तांनी मोरभवन डेपोमधील खड्ड्यांमध्ये चांगल्या दर्जाचा मुरूम टाकून त्यावर तातडीने रोलिंग करण्याचे निर्देश दिले. तसेच पावसाचा जोर ओसरताच, मुरूम टाकलेल्या भागावर पुन्हा रोलिंग करून मनपाच्या हॉटमिक्स विभागातर्फे डांबरीकरण करण्यात यावे, असे त्यांनी सूचना केल्या. डेपोच्या सुरक्षेसाठी गरजेनुसार शिफ्टप्रमाणे सुरक्षा रक्षक नेमण्याच्या ही सूचना त्यांनी यावेळी दिल्या. याशिवाय, आयुक्त डॉ. विपीन यांनी डेपोतील प्रवासी निवारागृह आणि स्मार्ट टॉयलेटचीही पाहणी केली. ही स्वच्छतागृहे सीएसआरच्या माध्यमातून चालविण्याबाबत त्यांनी सांगितले. डेपोमध्ये प्रवाशांसाठी आवश्यक सोयी-सुविधा वाढविण्यासोबतच, परिसराच्या सुशोभीकरणासाठी बांबूची झाडे लावण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# चंद्रपूर मनपातील सफाई कर्मचाऱ्यांच्या बेमुदत आमरण उपोषणाला बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाचा जाहीर पाठिंबा



**चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेतील सफाई कुली/सफाई रेजा (सफाई कामगार) व त्यांच्या वारसांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी दि. २२ जून २०२६ पासून चंद्रपूर महानगरपालिका मुख्यालयासमोर सुरू असलेल्या बेमुदत आमरण उपोषणाला दि. 1 जुलै 2026 ला बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने प्रत्यक्ष आंदोलनस्थळी भेट देऊन जाहीर पाठिंबा देण्यात आला. यावेळी बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनकर्ते, उपोषणकर्ते व उपस्थित नागरिकांशी सविस्तर चर्चा करून त्यांच्या प्रलंबित मागण्या जाणून घेतल्या. वारस नियुक्ती, सफाई कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, शासन निर्णय व न्यायालयीन आदेशांची तात्काळ अंमलबजावणी तसेच सफाई कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, या प्रमुख मागण्यांबाबत प्रशासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी भूमिका बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने मांडण्यात आली. तसेच या मागण्यांसंदर्भात महानगरपालिका प्रशासनाला बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजकुमार जवादे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने चंद्रपूर महानगर पालिकेचे उपायुक्त शेषराव टाले यांना निवेदन सादर करून चंद्रपूर महानगरपालीकेसमोर सुरू असलेल्या आमरण उपोषणाच्या आंदोलनबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

उपोषणकर्त्यांनी अनेक वर्षांपासून वारस नियुक्ती व इतर न्याय्य मागण्या प्रलंबित असल्याने अखेर बेमुदत आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे सांगितले. बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडिया या कामगार व कर्मचाऱ्यांच्या ट्रेड युनियने या आंदोलनाला पूर्ण पाठिंबा दर्शवित प्रशासनाने तात्काळ निर्णय घेण्याची मागणी केली. या प्रसंगी एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाचे चंद्रपूर जिल्ह्याचे अध्यक्ष संजय खोब्रागडे, चंद्रपूर शहर अध्यक्ष दिपक जुमडे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य अमर दुधे आणि ॲड. राजू राठोड इत्यादी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी आंदोलन करणारे ॲड. सुजय घडसे व उपस्थित सर्व आंदोलनात सहभागी असलेल्या अनेक महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाने आंदोलनाला पाठिंबा दिल्याबद्दल व चंद्रपूर महानगर पालिकेच्या प्रशासनासमोर सदर प्रश्न ठेवल्याबद्दल आभार मानले व चंद्रपूर महानगरपालिकेचे उपायुक्त शेषराव टाले यांनी बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाच्या शिष्टमंडळाला सांगितले की सदर आंदोलनाचा प्रश्न नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला व मार्गदर्शन मागविण्यात आले. मार्गदर्शन प्राप्त होताच बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाला सविस्तर कळविण्यात येईल असे आश्वासन दिले.

# ७ जुलैला काव्य गझल मुशायरा संमेलन व कवी भूषण सन्मान सोहळा!



**नागपूर :** वामनदादा कर्डक साहित्य प्रबोधिनी व डॉ. भूषणकुमार भस्मे मित्र परिवाराचे वतिने विद्रोही कवी, लेखक, सामाजिक कार्यकर्ते डॉ. भूषणकुमार भस्मे यांच्या ६५ व्या जन्म दिवसानिमित्त काव्य, गझल, मुशायरा संमेलन व कवी भूषण सन्मान सोहळ्याचे आयोजन ७ जुलै २०२६ रोजी दुपारी ३.०० वा. केले आहे. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी लोकनाथ यशवंत यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मेश्राम, प्रा. डॉ. मनोहर गजभिये, माजी प्राचार्य डॉ. अजय चिकाटे तर विशेष उपस्थिती विलास गजभिये, प्रा. डॉ. मुकूंद मेश्राम, प्रा. प्रविण कांबळे हे रहातील. या संमेलनात अतिथी कवी म्हणून एस. आर. शेंडे, तन्हा नागपूरी, विनोद विद्रोही, हृदय चक्रधर, कलाम खान, डॉ. भोला सरवर, सुर्यकांत मुनघाटे, शालीक जिल्हेकर, प्रसेनजीत गायकवाड, डॉ. सुनंदा जुलमे हे आपल्या रचना सादर करतील तर प्रकाश कांबळे, जगदीश राऊत, संजय गोडघाटे, डॉ. मनिष वानखेडे, प्रा. भिमराव गायकवाड, सुभाष मानवटकर, सुर्यभान शेंडे, सुरेश वंजारी, संजय सायरे, माणिक खोब्रागडे, प्रकाश बावनगडे, संदिप गायकवाड, सुधिर बारहाते, जयंत साठे, अशोक देशभ्रतार, लिलाधर गायकवाड, दिवाकर शिर्के, अशोक धमगाये, दादाराव पाटील, चित्तरंजन चौरे, रमेश गजभिये, भूपेश वराडे, नाना शेंडे, प्रभू फुलझेले, चरणदास वैरागडे, माधव जांभूळे, राहुल शामकुवर, माधुरी वसंतशोभा, रजनी संबोधी, डॉ. मोनाली पोफरे, प्रितीबाला बोरकर, प्रतिभा सहारे, रजनी फुलझेले, निर्मला जिवने, मिरा मदनकर इत्यादी कवी गझलकार आपल्या सदाबहार रचना सादर करतील. संचालन जेष्ठ कवी मनोहर गजभिये, रंगराज गोस्वामी व रोशनी अंबर आपल्या अनोख्या शैलीत करुन या सांस्कृतिक महोत्सवाला रंगत आणतील. हा कार्यक्रम विमेंन्स विंग्स फिटनेस क्लब, सम्राट अशोक कॉलनी, काशीनगर, रामेश्वरी रोड, नागपूर येथे होणार असून डॉ. भूषणकुमार भस्मे मित्र परिवाराचे सदस्य विनोद आटे, ॲड. बाबला पाटील, ॲड. विष्णू पानतावणे, निरज वैरागडे, अविनाश हाडके, सुधाकर म्हैसकर, रमेश बनसोड, सिद्धार्थ ढेंगरे, रमेश चहारे, अमर बागडे, राहुल निखाडे व वामनदादा कर्डक साहित्य प्रबोधिनीचे कार्यकर्ते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कामाला लागले आहेत.

## अमरावती येथे चौथे वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलन संमेलनाध्यक्ष

# युवराज गंगाराम, उद्घाटक पदी आनंद देवडेकर





**अमरावती :** अ. भा. आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन महामंडळाचे चौथे वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलनाचे आयोजन स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन भीम टेकडी येथे करण्यात येणार आहे. १८ आणि १९ जुलै रोजी होऊ घातलेल्या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून युवराज गंगाराम आणि उद्घाटक म्हणून प्रा. आनंद देवडेकर यांची निवड झाल्याची माहिती महामंडळाचे निमंत्रक प्रशांत वंजारे यांनी दिली आहे. संमेलनाध्यक्षपदी निवड झालेले युवराज गंगाराम हे साक्षेपी समीक्षक आणि कवी आहेत. त्यांचे 'डायरी, काही राहिलेल्या नोंदी, एक पूर्णविराम अनेक प्रश्नचिन्हे' इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. विविध पुरस्कार प्राप्त युवराज गंगाराम यांचे 'कवितेच्या तळाशी तत्वाभ्यास', दृष्टीक्षेपातील तत्त्वचिंतन आदी समीक्षा ग्रंथ सुद्धा प्रसिद्ध आहेत. आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते असणाऱ्या युवराज गंगाराम यांनी विविध साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद सुद्धा भुषविले आहे. उद्घाटक पदी निवड झालेले प्रा. आनंद देवडेकर हे बहुचर्चित सध्दम्म पत्रिका या मराठी मासिकाचे संपादक आहेत. मूल्यांत्तरोत्तर काळात निखळ बौद्ध साहित्य संस्कृतीच्या संवर्धनात सद्धम्म पत्रिकेचे ऐतिहासिक योगदान आहे. प्रा. देवडेकर यांची ओळख महाराष्ट्राच्या विवेकवादी बौद्धिक परंपरेचा वारसा जपणारा संपादक,विचारवंत, लेखक आणि प्रभावी वक्ता म्हणून सुद्धा आहे. प्रा. सतेश्वर मोरे स्मृती प्रतिष्ठान , अमरावती ही स्थानिक सामाजिक संस्था संमेलनाचे आयोजन करणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या विचार उत्सवात परिसंवाद, परिचर्चा, नाट्य, गझल प्रज्ञा, कवी संमेलन, कथाकथन , गीत गायन इत्यादी दर्जेदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून कवी, लेखक, विचारवंत, कलावंत या संमेलनात सहभागी होणार आहेत. संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते इंजि. दिनेश खोंडे तर मुख्य संयोजक पदाची धुरा ज्येष्ठ कार्यकर्ते आणि गझलकार नंदकिशोर दामोधरे यांच्यावर सोपवण्यात आली आहे. या संमेलनाला उपस्थित राहून सहकार्य करण्याचे आवाहन सीमा मेश्राम, छाया खोब्रागडे, अरविंद निकोसे, नंदकिशोर दामोधरे, संजय मोखडे आदींनी केले आहे.

# महापौरांच्या पुढाकाराने चंद्रपूरमधील सफाई कर्मचाऱ्यांचे उपोषण मागे

### लाड-पागे समितीच्या शिफारशींबाबत तातडीने मार्गदर्शन घेण्याचे निर्देश



**चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड-पागे समितीच्या शिफारशींनुसार सफाई कुली व सफाई रेजा पदांवर नियुक्ती देण्याच्या मागणीसाठी गेल्या २२ जूनपासून सुरू असलेले बेमुदत संप आणि आमरण उपोषण अखेर महापौरांच्या सकारात्मक हस्तक्षेपामुळे मागे घेण्यात आले.

या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी महापौरांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात उपोषणकर्त्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीला आमदार सुधाकर अडबाले (शिक्षक पदवीधर मतदारसंघ), महानगरपालिका आयुक्त अकुनुरी नरेश, सभागृह नेत्या जयश्री जुमडे, उपायुक्त शेषराव टाले, नगरसेवक प्रदीप देशमुख, सुनील खंडेलवाल तसेच संबंधित अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत लाड-पागे समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीसंदर्भातील विविध शंकांचे निरसन करण्यात आले. या संदर्भात शासनाकडून तातडीने आवश्यक मार्गदर्शन मागवून त्यानुसार कोणताही विलंब न करता पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश महापौरांनी प्रशासनाला दिले.

यावेळी महापौरांनी उपोषणकर्त्यांना आश्वस्त केले की, सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांवर कोणताही अन्याय होऊ दिला जाणार नाही. शासनाच्या नियमांनुसार न्याय्य निर्णय व्हावा यासाठी महानगरपालिका प्रशासन आवश्यक ती सर्व कार्यवाही करेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

महापौरांच्या या सकारात्मक भूमिकेवर विश्वास व्यक्त करत उपोषणकर्त्यांनी २२ जूनपासून सुरू असलेले बेमुदत संप व आमरण उपोषण मागे घेण्याची घोषणा केली. तसेच महापौर, उपस्थित लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने प्रश्न सोडविण्यासाठी दाखविलेल्या संवेदनशीलतेबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

संवाद आणि समन्वयाच्या माध्यमातून हा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न सकारात्मक दिशेने मार्गी लागल्याचे या बैठकीत स्पष्ट झाले. शासनाकडून आवश्यक मार्गदर्शन प्राप्त होताच लाड-पागे समितीच्या शिफारशींबाबत पुढील कार्यवाही तातडीने करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

# पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या वर्धापन दिनानिमित्त आज वैचारिक कार्यशाळा

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन आणि दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या वर्धापन दिनानिमित्त रविवार, ५ जुलै रोजी दुपारी २.३० वाजता जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजीनगर येथे १७८ वी मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८ जुलै १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली नसती, तर शैक्षणिक दृष्ट्या आपण कुठे असतो? या ऐतिहासिक आणि समकालीन विषयावर या कार्यशाळेत सखोल चर्चा होणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटनपर मार्गदर्शन मिलिंद महाविद्यालयाचे प्रा. सुधाकर नवसागर करणार असून, पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या संरक्षणासाठी कार्यरत बांधिलकी फाउंडेशनचे अध्यक्ष अविनाश कांबळे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचे अध्यक्षस्थान फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम भूषविणार आहेत. या कार्यशाळेत नोंदणीकृत प्रतिनिधींना आपली मते मांडण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सामाजिक जनजागृतीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या कार्यक्रमास कार्यकर्ते, विद्यार्थी, अभ्यासक आणि नागरिकांनी मित्रपरिवारासह उपस्थित राहावे, असे आवाहन फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनच्या वतीने केले आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648